

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १३९
www.ramprahar.com
बुधवार, ६ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
'करिअर मार्गदर्शन कार्यक्रम महाराष्ट्रभर राबविणार'/२
महाडमध्ये ट्रॅक्टरचा टायर फुटून एकाचा मृत्यू/५
जिल्हास्तरीय तायक्वाँदो स्पर्धेत कोपरखैरणे शाळेचा डंका/८

## शासन आपल्या दारी कार्यक्रमाचे महत्त्व
# घरात बसणाऱ्यांना काय कळणार
### ■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला

**बीड : प्रतिनिधी**

जे अडीच वर्षे केवळ घरात बसले त्यांना शासन आपल्या दारी कार्यक्रमाचे महत्त्व काय समजणार, असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी (दि. ५) माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लगावला. या कार्यक्रमाला बोगसगिरी म्हणणे म्हणजे येथे उपस्थित असलेल्या सामान्यांचा अपमान करण्यासारखे आहे. बदनामी करणाऱ्यांना योग्य वेळी उत्तर देऊ, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

बीड जिल्ह्यातील परळी येथे शासन आपल्या दारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, कृषीमंत्री धनंजय मुंडे, माजी मंत्री पंकजा मुंडे आदी उपस्थित होते. त्या वेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

आतापर्यंत झालेल्या 'शासन आपल्या दारी'मध्ये सगळ्यात यशस्वी हा कार्यक्रम झाला. ही रेकॉर्डब्रेक गर्दी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगून आतापर्यंत २० कार्यक्रम झाले आणि एक कोटी ८४ लाख लोकांनी लाभ घेतल्याची माहिती दिली.

सरकारचा बोगस कार्यक्रम आहे, असे काहीजण म्हणतात. त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. मोठ्या प्रमाणावर लोक या कार्यक्रमाला येत आहेत. ही पोटदुखी त्यांच्या छातीत धडकी भरवणारी असल्याची टीका मुख्यमंत्री शिंदेंनी विरोधकांना उद्देशून केली.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीतील निकाल बघून पंतप्रधान नरेंद्र मोदींची लाट दिसली. लाट संपली म्हणणाऱ्यांना सडेतोड उत्तर मिळाले असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. या वेळी उपमुख्यमंत्री फडणवीस व पवारांसह इतरांनीही विचार मांडले.

### मुंडे बंधू-भगिनी एका मंचावर
या कार्यक्रमाच्या निमित्ताने कृषिमंत्री व राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे आणि भाजप नेत्या व माजी मंत्री पंकजा मुंडे हे बहीण-भाऊ एका मंचावर उपस्थित होते. याचा उपस्थित व्यक्त्यांनी उल्लेख करून आनंद व्यक्त केला. पंकजा व धनंजय मुंडे यांनीही यावर टिप्पणी करीत वरिष्ठ नेत्यांच्या सुरात सूर मिळविला. त्यामुळे उपस्थितांमध्येदेखील समाधान दिसून आले.

### शिवरायांची राजमुद्रा नौसैनिकांच्या गणवेशावर लावण्याचा निर्णय
## रायगड भाजपतर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार



**पनवेल** : नौसेना दिनानिमित्ताने सोमवारी सिंधुदुर्गमधील राजकोट किल्ल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण केले आणि शिवरायांच्या ऐतिहासिक योगदानाला उजाळा दिला. गेल्या वर्षी मोदी सरकारने नौसेनेच्या झेंड्यावरून ब्रिटिशांच्या खुणा काढून महाराजांची छटा लावली होती. आता नौसेनेच्या प्रत्येक सैनिकाच्या गणवेशावर शिवकालीन राजमुद्रा असणार आहे. या दोन्ही गोष्टी महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाच्या आणि अभिमानाच्या आहेत. म्हणून उत्तर रायगड जिल्हा भाजपतर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना आभार व्यक्त करून त्यांना धन्यवाद दिले. **(पान २ वर..)**






**पनवेल : सचिन टेकाळे आणि नितीन टेकाळे यांनी लॅपटॉप वर्ल्ड सेल्स ॲण्ड सर्व्हिसची तिसरी शाखा सुरू केली आहे. या शाखेचे उद्घाटन भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी झाले. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.** (वृत्त पान ३ वर..)

## ऐतिहासिक भिडे वाड्याच्या स्मारकाचा मार्ग मोकळा

**पुणे** : क्रांतिसूर्य महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींची देशातील पहिली शाळा पुण्यातील ज्या भिडे वाड्यात सुरू झाली होती तो वाडा आता सुप्रीम कोर्टाच्या आदेशाने महापालिकेने जमीनदोस्त केला आहे.

गेल्याच महिन्यात सर्व भाडेकरूंची याचिका सुप्रीम कोर्ट फेटाळून लावली आणि भिडे वाडा पालिकेला ताब्यात देण्याचा निर्णय दिला. त्यानुसार मध्यरात्री पोलीस बंदोबस्तात पुणे मनपाने वाड्याचा ताबा घेतला. पोलीस बंदोबस्तात ही मोहीम रातोरात फत्ते केली गेली. या जागी राष्ट्रीय स्मारक उभे राहिल.


## निवडक

### राष्ट्रीय राजपूत करणी सेनेच्या अध्यक्षाची दिवसाढवळ्या हत्या

**जयपूर** : राजस्थानची राजधानी जयपूरमध्ये राष्ट्रीय राजपूत करणी सेनेचे अध्यक्ष सुखदेव सिंह गोगामेडी यांची दिवसाढवळ्या घरात घुसून गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे, तर सुखदेव यांच्यासोबत असणारे अजित सिंह गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान, लॉरेन्स बिश्नोई गँगचा सदस्य रोहित गोदारा याने या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. पोलीस हल्लोखोरांचा शोध घेत आहेत.

### सीआयडी मालिकेतील दिनेश फडणीस यांचे निधन

**मुंबई** : सीआयडी या मालिकेत 'फ्रेड्रिक्स'ची भूमिका साकारणारे अभिनेते दिनेश फडणीस (वय ५७) यांचे निधन झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते, मात्र त्यांची ही झुंज अपयशी ठरली आहे.



## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाला सर्वोत्कृष्ट ज्युनियर कॉलेजचा पुरस्कार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाला सर्वोत्कृष्ट ज्युनियर कॉलेजचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यालयाच्या प्राचार्य डॉ. निशा नायर यांच्यासह शिक्षकांचे मंगळवारी (दि.५) अभिनंदन केले.

महाराष्ट्र सरकारच्या शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग यांच्या सहकार्याने आणि इएसएफईद्वारे रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाला सर्वोत्कृष्ट ज्युनियर कॉलेजचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. मुंबईतील बीकेसी मैदानावर झालेल्या सोहळ्यात प्राचार्य डॉ. निशा नायर, वरिष्ठ शिक्षिका स्वप्ना भांडवलकर आणि महेंद्र पाटील यांनी मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला.

भारतातील विविध राज्यांतील शिक्षणतज्ज्ञ आणि संस्थांना गुणवत्तेच्या आधारावर पुरस्कार देण्यात आले. अशा नामांकित व्यासपीठावर रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाला सर्वोत्कृष्ट कनिष्ठ महाविद्यालयचा पुरस्कार मिळणे हा अभिमानाचा क्षण आहे. **(पान २ वर..)**






# 'करिअर मार्गदर्शन' महाराष्ट्रभर राबविणार

## कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांची ग्वाही

**मुंबई : प्रतिनिधी**

विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्या अथक परिश्रमातून भावी पिढी घडत असते. मुलांना स्वप्न बघण्याचा, उंच भरारी घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यांच्या पंखांना बळ देण्याची जबाबदारी शासनाची आहे. करिअर मार्गदर्शन उपक्रमातून कोणत्याही शाळेने ५० विद्यार्थ्यांना एकत्र आणून एखादे कौशल्य आत्मसात करण्याचे ठरवले तर त्यासाठी आवश्यक सर्व सहकार्य करणार असून, आज प्रायोगिक तत्वावर सुरू झालेला करिअर मार्गदर्शनाचा कार्यक्रम पूर्ण महाराष्ट्रभर राबविण्याचा मानस आहे, अशी ग्वाही कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यतामंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून मुंबईमधील ३०० शाळा आणि महाविद्यालयांतील ६० हजार विद्यार्थ्यांना करियर संदर्भातील मार्गदर्शन देण्यात येणार आहे. मंत्री लोढा यांच्या हस्ते सह्याद्री अतिथीगृह येथे या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, शालेय शिक्षण विभाग, शिक्षण संचालनालय आणि मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवला जाणार आहे.



प्रातिनिधिक स्वरूपात प्रायोगिक तत्वावर १५ शाळांमध्ये हा उपक्रम राबवला गेला.

या वेळी मंत्री लोढा म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवीन शैक्षणिक धोरण आणले. त्यामध्ये कौशल्य विकासावर अधिक भर दिला आहे. मुलांना, पालकांना आणि महाविद्यालयांना वेळेत विद्यार्थ्यांचा कल वेळेत कळावा यासाठी हे मार्गदर्शन खूप महत्त्वाचे आहे. भारतात गुरूकूल पध्दतीची आर्दश शिक्षण पध्दती बंद करून इंग्रजानी कारकूनी शिक्षण पध्दती आणली. आज आपण कौशल्य विकास शिक्षणात आमूलाग्र बदल करत आहोत. आज राबविण्यात येणारा उपक्रम फक्त शासनाचा उपक्रम म्हणून पाहू नका. सर्वांचे यामध्ये योगदान मोलाचे आहे. परदेशी भाषा अवगत करण्यासाठी परदेशी भाषांचे प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे, असेही ते म्हणाले.

या वेळी मंत्री लोढा म्हणाले की, जगभरातून कुशल मनुष्यबळाची मागणी वाढत आहे. नुकतीच इस्त्राईलमधून पाच हजार कुशल मनुष्यबळाची मागणी आली आहे. इस्त्राईलमध्ये नोकरी मिळाल्यानंतर तिथे संपूर्ण राहण्याचा व इतर खर्च ते सरकार करणार असून हा खर्च वगळता भारतीय चलनाप्रमाणे दीड लाख रूपये पगाराची नोकरी मिळू शकते. शालेय स्तरापासून विद्यार्थ्यांना कौशल्यावर आधारित शिक्षण देण्यासाठी कौशल्य विकास शाळा सुरू करत आहोत. तसेच प्रमोद महाजन कौशल्य विकास योजना, किमान कौशल्य विकास योजना सुरू आहेत. ३५० गावांत कौशल्य विकास केंद्र सुरू करत आहोत. फक्त विद्यार्थ्यांकडून अपार कष्ट आणि शिकण्याची जिद्द या गोष्टींची आवश्यकता आहे, असेही मंत्री लोढा म्हणाले.

### असा आहे कार्यक्रम

मुंबई महानगर क्षेत्रातील खासगी अनुदानित, विनाअनुदानित शाळा तसेच महाविद्यालयांमध्ये ३०० शाळा, ६० हजार विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी करिअर मार्गदर्शनपर मेळावा पहिल्या टप्प्यामध्ये आयोजित केला जाणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय आणि मुंबई महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविला जातोय. यामध्ये करिअर कसे निवडावे, करिअरच्या विविध वाटा, व्यक्तिमत्व विकास, कृत्रिम बुध्दीमत्तेच्या सहाय्याने अभ्यास कसा करावा याबाबत विद्यार्थी व पालकांना तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन केले जाणार आहे. अभ्यासक्रमांची माहिती असलेली करिअर प्रदर्शनी पाहण्यास उपलब्ध असेल. विविध करिअर क्षेत्रे, विविध अभ्यासक्रम, प्रवेश परीक्षा, प्रवेश प्रक्रिया, स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती योजना याबाबत माहिती असलेले करिअर प्लॅनर हे पुस्तक विद्यार्थी व पालकांना विनामूल्य देण्यात येईल.

# 'नवीन शैक्षणिक धोरणाला विद्यापीठांनी गती द्यावी'

**मुंबई : प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या शैक्षणिक उपाययोजना करून नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणीला अधिक गती द्यावी, असे सांगून विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या तृयीयपंथी विद्यार्थ्यांची संपूर्ण शैक्षणिक फी विद्यापीठाने भरण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी मुंबई येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोण अंमलबजावणी संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बैठक झाली. या बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. निपुण विनायक, उपसचिव अजित बाविस्कर, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, सर्व अकृषी विद्यापीठाचे कुलगुरू, सहसंचालक प्रकाश बच्छाव, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० सुकाणू समितीचे अध्यक्ष डॉ. नितीन करमळकर, प्राचार्य अनिल राव, स्टेट युनिव्हर्सिटीचे कुलगुरू, संबंधित अधिकारी उपस्थित होते.

विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या तृयीयपंथी विद्यार्थ्यांची संपूर्ण शैक्षणिक फी (शैक्षणिक शुल्क) विद्यापीठाने स्वनिधीतून भरावी आणि या विद्यार्थ्यांना मोफत उच्च शिक्षण उपलब्ध होईल यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन उच्च शिक्षण मंत्री पाटील यांनी या बैठकीत केले.

या आवाहनाला प्रतिसाद देत सर्व कुलगुरूंनी बहुमताने हा निर्णय मान्य केला. त्यामुळे यापुढे तृतीयपंथी विद्यार्थ्यांना विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयात मोफत उच्च शिक्षण घेता येणार आहे.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील म्हणाले, अठरा वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक नवमतदारांची नोंदणी व्हावी. यासाठी निवडणूक विभागाच्या वतीने नवमतदार नोंदणी मोहीम विद्यापीठ आणि महाविद्यालयात राबविण्यात यावी या मोहिमेत 'एनएसएस'नी पुढाकार घ्यावा त्यामुळे महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी होईल. यासाठी राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) टीमने पुढाकार घ्यावा.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील यांनी नवीन शैक्षणिक धोरणातील महत्वाच्या विषयांवर लक्ष केंद्रीत करून विद्यापीठांवर शैक्षणिक धोरण राबविण्याची मोठी जबाबदारी असल्याचे यावेळी सांगितले.

विविध स्तरांवर उच्च व तंत्र शिक्षणापासून काही विद्यार्थी दूर राहतात आणि ते विद्यार्थी व्यवसाय, नोकरीत असतात अशा विद्यार्थ्यांच्या मनात परीक्षेची भिती असते, या विद्यार्थ्यांसाठी ऑडिओ-व्हिज्युअल, उद्योग क्षेत्र यांची मदत घेऊन प्रमाणपत्र कोर्स अभ्यासक्रमाची यादी तयार करता येईल का याचाही विचार विद्यापीठाने करावा.




### अचूक नियोजनाबाबत सूचना

बैठकीत नॅक मूल्यांकन, आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम, कौशल्याभिमुख अभ्यासक्रम, उद्योजकांचा सहभाग, क्लस्टर महाविद्यालये, मातृभाषेतून शिक्षण, सीबीसीएस पद्धती, एबीसी प्राध्यापक भरती, प्रशिक्षण, सायबर गुन्हे, शैक्षणिक वेळापत्रक व गुणांकन कार्यपध्दतीचे अचूक नियोजन करावे, अशा सूचनाही मंत्री चंद्रकांत पाटील यांनी या वेळी केल्या.

## निवडक

### १२ डिसेंबरला पेन्शन अदालत

**नवी मुंबई :** कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवारी (दि. १२) सकाळी ११ वाजता कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे. पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे, असे तहसीलदार, (सामान्य प्रशासन) कोकण विभाग यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

### अल्पसंख्याक हक्क दिवस

**नवी मुंबई :** अल्पसंख्याक हक्क दिवस १८ डिसेंबर रोजी प्रतिवर्षी साजरा करण्यासाठी राज्य शासनाचे शासन परिपत्रकान्वये २९ नोव्हेंबर २०२३नुसार कळविले आहे. तरी जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्हयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन सर्वत्र अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा करावा, असे उप आयुक्त (सामान्य प्रशासन) कोकण विभाग अजित साखरे यांनी प्रसिध्द पत्रकान्वये कळविले आहे.

# शिरढोणमध्ये ड्रग्जसह एक जण ताब्यात

**पनवेल :** शिरढोण परिसरात अमली पदार्थ विरोधी पथकाने सहा लाखांचा मेफेड्रॉन ड्रग्ज जप्त केले आहे. याप्रकरणी शादाब सय्यद (वय ४२, रा. मुंब्रा) याला अटक करण्यात आले आहे.


मुंबई-गोवा मार्गावर शिरढोण येथे अमली पदार्थाची तस्करी होणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक नीरज चौधरी यांनी सहायक निरीक्षक नीलेश धुमाळ, उपनिरीक्षक कुलदीप मोरे यांचे पथक गेले होते. या पथकाने शिरढोण येथे गोवा मार्गालगत सापळा रचला, तेथे शादाबवर संशय आल्याने त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याकडे ६ लाख १० हजार रुपये किमतीचा मेफेड्रॉन (एमडी) हे ड्रग्ज आढळून आले.

# कोकण भवनच्या इमारतीत संकटकालीन बचाव प्रशिक्षण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण भवन प्रशासकीय इमारतीच्या आवारात संकटकालीन बचाव प्रशिक्षणाचे (मॉकड्रिल) आयोजन मंगळवारी (दि. ५) करण्यात आले. या वेळी नवी मुंबई महापालिकेचे अग्निशमन अधिकारी आणि कोकण भवनमधील अधिकारी अथवा कर्मचारी उपस्थित होते.

कोकण भवन प्रशासकीय इमारतीत सात मजले असून विविध विभागाची कार्यालये तसेच मोठ्या प्रमाणावर अधिकारी व कर्मचारी काम करीत आहेत. अशावेळी या इमारतीत आग लागल्यास अगर कोणतीही आपत्ती ओढावल्यास त्यावर करावयाच्या प्रतिसादाची प्रक्रिया तपासणी करता नवी मुंबई महापालिका सीबीडी बेलापूर नवी मुंबई याद्वारे संकटकालीन बचाव प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विविध प्रात्याक्षिके दाखविण्यात आली. या प्रशिक्षणाला कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.



आपत्ती व्यवस्थापनाच्या या प्रशिक्षणासाठी विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या पुढाकाराने उपायुक्त (महसूल) विवेक गायकवाड, उपायुक्त (सामान्य) अजित साखरे, अग्निशमन केंद्राचे अधिकारी जगदिश पाटील, तहसीलदार माधुरी डोंगरे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## 'महाराष्ट्र भवनचे काम पूर्ण करा'

**नवी मुंबई :** वाशीमध्ये असलेल्या आरक्षित भुखंडावर महाराष्ट्र भवनचे काम तातडीने करणेबाबत सिडको प्रशासनाला निर्देश देण्याची लेखी मागणी राष्ट्रवादीचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष नामदेव भगत यांनी केली आहे. महाराष्ट्र भवनच्या कामाला सिडकोने लवकरात लवकर सुरुवात करावी, यासाठी संबंधितांना निर्देश देण्याची मागणी नामदेव भगत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांकडे निवेदनातून केली आहे.

# दरीत पडलेल्या महिलेला सुखरूप काढले बाहेर

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानला लागूनच असलेल्या पेब किल्यावर ट्रेकिंगसाठी गेलेली महिला अचानक दरीत पडली. रेस्क्यू टीमच्या आणि माथेरान पोलिसांच्या अथक परिश्रमाने त्या महिलेला सुखरूप दरीतून काढण्यात यश आले.

दरीतून ती महिला वाचवा म्हणून ओरडत असताना पेब किल्यावर असणाऱ्या पुजाऱ्याने तो आवाज ऐकला आणि पोलिसांना खबर दिली. सह्याद्री रेस्क्यू टीमने महिलेला दरीतून बाहेर काढले.

पान १ वरुन

## रायगड भाजपतर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार

या वेळी भाजपच्या पनवेल येथील मध्यवर्ती कार्यालयात भाजपचे तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, विनायक मुंबईकर, विश्वजित पाटील हेही उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी पुढे बोलताना सांगितले की, स्वतंत्र भारताच्या इतिहासात गेली सत्तर वर्षे आपल्या सशस्त्र सेनांचे दिवस दिल्लीतील एखाद्या लॉनवर साजरे होत असत. सत्तर वर्षांत प्रथमच एक पंतप्रधान आपला नौसेना दिन साजरा करण्यासाठी सिंधुदुर्ग येथे आले होते. मध्ययुगाच्या पूर्ण गुलामगिरीच्या इतिहासात एकमेव छत्रपती शिवाजी महाराज होते, ज्यांनी आरमाराचे महत्त्व ओळखले. ज्याच्याकडे आरमार त्यांची समुद्रावर सत्ता, त्या राज्याचे समुद्रकिनारे बळकट आणि अंतिमतः जगाच्या व्यापाराचे दरवाजे त्या राज्यासाठी खुले होतात. असा सर्व विचार करून शिवरायांनी स्वतःचे आरमार उभे केले. त्या अर्थाने महाराज ते आधुनिक भारताच्या नौसेनेचे जनक ठरतात. या पार्श्वभूमीवर नौसेनेच्या ध्वजावर शिवरायांच्या मुद्रेवरून प्रेरणा घेऊन नवीन छटा साकारण्यात आली होती. आता नौसेनेच्या प्रत्येक सैनिकाच्या गणवेशावर शिवरायांची राजमुद्रा असणार आहे.

गेली सत्तर वर्षे स्वतंत्र भारताची नौसेना गुलामगिरीचे प्रतीक असलेल्या ध्वजाला वंदन करीत होती. मोदी सरकारने हे एक गुलामगिरीचे प्रतीक नष्ट करून देशवासीयांना आणि नौसेनेलाही अभिमान वाटेल असा हा बदल करून दाखवला. त्यामुळे आता ब्रिटिशधार्जिणी मुद्रा भारतीय सैनिक बाळगणार नाही.

आधुनिक भारताच्या नौसेनेचे जनक म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरव करणारे मोदी सरकार हे स्वतंत्र भारताच्या इतिहासातील पहिले सरकार आहे. आधुनिक भारताची नौसेना या महाराष्ट्राच्या कोकणाच्या भूमीत निर्माण झाली. कालच्या नौसेनेच्या प्रात्यक्षिकांमध्ये एका युद्धनौकेचे नेतृत्व महिलेच्या हातात देण्यात आले होते. मोदी सरकारने महिला सक्षमीकरणासाठी जितक्या गोष्टी केल्या आहेत तितक्या गेल्या सत्तर वर्षांत कोणी केल्या नसतील. नौसेनेमध्येसुद्धा नारीशक्तीला प्रोत्साहन देण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे, असेही अविनाश कोळी यांनी नमूद केले.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाला पुरस्कार

उच्च माध्यमिक विद्यालयाला पुरस्कार मिळाल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्राचार्यासह शिक्षकांचे अभिनंदन केले. या वेळी प्राचार्य निशा नायर, शिक्षक दुर्गा मौर्या, अंजली डाके, नमिता आखुरी, प्रणाली जाधव उपस्थित होत्या.

# विंधणे येथे रक्तदान शिबिर

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

सामाजिक कार्यकर्ते धनराज पाटील यांनी राज्यातील थॅलेसेमिया रुग्णांची रक्ताची अडचण दूर करण्याच्या उद्देशाने रक्तदाब शिबिरात ४७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिराचे उद्घाटन स्वराज्य संघटना महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष विनोद सदाशिव साबळे यांच्या हस्ते झाले.

या वेळी करंजाडेतील स्वराज्य संघटनेचे ज्वालासिंह देशमुख, ग्रामपंचायत सदस्य अतिष साबळे, कुणाल जाधव, नितीन ओंबळे, गणेश पोशा कोळी, भगवान म्हात्रे, विंधणे खालचापाडा ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष कृष्णा कोळी, जयराम पाटील, केतन पाटील, विनोद पाटील आदी उपस्थित होते.



कार्यक्रमासाठी धनराज पाटील, निवास पाटील सुनील वर्तक, सुनील पाटील, अमित पाटील, अनुज पाटील, यश पाटील, मिलिंद पाटील आणि धनराजच्या परिवाराने विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे निवेदक सुनील वर्तक, जीवन डाकी आणि दीपक पाटील यांनी केले.

# अपूर्ण अवस्थेतील ड्रेनेज गटारामुळे नागरिक त्रस्त

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरातील खालचा जीवना परिसरात ड्रेनेज गटाराचे काम अपुर्ण ठेवल्याने नागरिकांना उघड्या अवस्थेतीत ड्रेनेज गटाराचा त्रास होऊ लागला आहे.



शहरातील खालचा जीवना परिसरात सहा महिन्यांपूर्वी श्रीवर्धन नगर परिषदेकडून एका ठेकेदाराला ड्रेनेज गटाराचे काम देण्यात आले होते, परंतु ड्रेनेज गटाराचे काम अपुर्ण ठेवल्याने खालचा जीवना परिसरातील नागरिक रात्री अपरात्री उघड्या अवस्थेतील ड्रेनेज गटाराचा अंदाज न आल्याने गटारात पडून किरकोळ जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

रहिवासी महेश चोगले यांनी हे अपुर्ण अवस्थेत असणारे ड्रेनेज गटाराचे काम श्रीवर्धन नगर परिषदेकडून लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

# मोरे महिला महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाचा 'आविष्कार'

**रोहे : प्रतिनिधी**

एम बी मोरे महिला महाविद्यालय, धाटाव रोहा येथे ४ डिसेंबर २०२३ रोजी मुंबई विद्यापीठाच्या 'आविष्कार' या स्पर्धेच्या रायगड जिल्हास्तरीय फेरीचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करण्यास विद्यापीठाने सुरू केलेला स्तुत्य उपक्रम आहे. रायगड जिल्ह्यातील १६ महाविद्यालयातील ४१६ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला. 'आविष्कार' या स्पर्धेच्या सहा विभागांतील सादर केलेल्या २०३ संशोधन प्रकल्पांचे परीक्षण करण्यात आले आणि विद्यापीठ स्तरावर भाग घेण्यास स्पर्धक निवडण्यात आले.



उद्घाटनावेळी मुंबई विद्यापीठाच्या 'आविष्कार' उपक्रमाचे समन्वयक डॉ भूषण लांगी, रायगड जिल्हा समन्वयक डॉ दिनेश भगत आणि डॉ. जगदीश ठाकूर, एम बी मोरे फाऊंडेशन सामाजिक सेवा संस्थेचे संचालक अशोक मोरे आणि उत्तमराव मोरे उपस्थित होते. या विभागीय फेरीचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य श्री प्रसन्न म्हसळकर आणि रिसर्च सेल समितीच्या प्रा. प्रतिमा भोईर आणि प्रा. निकिता महाडिक यांनी केले.

# राज्यस्तरीय अटल करंडक स्पर्धेची शुक्रवारपासून महाअंतिम फेरी

## निवड झालेल्या २५ एकांकिकांचा घेता येणार आस्वाद | सिने व नाट्य क्षेत्रातील मान्यवरांची लाभणार मांदियाळी | ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री मोहन आगाशे यांचा होणार गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी ८ ते १० डिसेंबर रोजी होणार आहे. या वेळी राज्यभरातून निवड झालेल्या २५ एकांकिकांचा आस्वाद नाट्य रसिकांना घेता येणार असून या स्पर्धेकरिता सिने व नाट्य क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांची मांदियाळी लाभणार आहे.

पनवेल येथील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणाऱ्या या महाअंतिम फेरीचे उद्घाटन शुक्रवारी (दि. ८) सकाळी ८ वाजता होणार असून या वेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष व सुप्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले तसेच भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा राजेश्री वावेकर प्रमुख पाहुणे म्हणून तर आदरणीय उपस्थिती म्हणून सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, माजी नगरसेवक राजू सोनी, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे यांची उपस्थिती असणार आहे.




पारितोषिक वितरण समारंभ रविवारी (दि. १०) सायंकाळी ५ वाजता होणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे असणार असून सन्माननीय उपस्थिती म्हणून गौरव रंगभूमी पुरस्काराचे मानकरी ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. मोहन आगाशे, पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, सुप्रसिद्ध उद्योजक विलास कोठारी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची उपस्थिती असणार आहे. या वेळी सुप्रसिद्ध अभिनेते विजय पाटकर, लेखक व दिग्दर्शक राजन ताम्हाणे, अभिनेते लेखक व दिग्दर्शक संजय मोने, सुप्रसिद्ध अभिनेते भरत सावले, सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, अटल करंडक स्पर्धेचे ब्रॅण्ड अँबेसिडर सुप्रसिद्ध अभिनेता अजिंक्य ननावरे आदींची आदरणीय उपस्थिती असणार आहे.

यंदा या स्पर्धेचे दहावे वर्ष असून या स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे इतरही पारितोषिके आहेत, तर यंदाच्या गौरव रंगभूमी पुरस्काराने ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ. मोहन आगाशे यांना सन्मानित करण्यात येणार आहे. स्पर्धेचे मुख्य प्रायोजक टीआयपीएल, सहप्रायोजक निल ग्रुप, तर सोशल मीडिया प्रायोजक इट्स माजा डॉट कॉम आहे. तीन दिवसांत दर्जेदार अशा २५ एकांकिकांचा विनामूल्य लाभ घेता येणार आहे. त्यामुळे या स्पर्धेचा नाट्यरसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते व अटल करंडक स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ ठाकूर, अटल करंडक आयोजन कमिटी उपाध्यक्ष विलास कोठारी, स्पर्धा सचिव व सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी केले आहे.

### असे आहे वेळापत्रक

**८ डिसेंबर**–व्हाइट लाईट, ठाणे (अनोळखी), माणुसकी मल्टिपर्पज फाउंडेशन, बुलढाणा (अनपेक्षित), अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, नाशिक (अ डील), वसा नाट्यपरंपरेचा (काव काव), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज, कोल्हापूर (असणं नसणं), फनकार क्रिएटीव, अहमदनगर (बोळवण), त्रिकुटालय थिएटर, पनवेल (क्वीन ऑफ द नाइट), आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नागोठणे (शहीद), स्वर्ण पटकथा, क्राऊड (खुदिराम).

**९ डिसेंबर**–मराठवाडा मित्रमंडळाचे वाणिज्य महाविद्यालय पुणे (सिनेमा), प्रताप महाविद्यालय अमळनेर (तो, पाऊस आणि टाफेटा), बॅकस्टेज वाला ग्रुप पनवेल (आऊट बर्स्ट), कलाकार मंडळी पुणे (चाहुल), ढ मंडळी कुडाळ (ढीम टँग, ढीटँग), कलांश थिएटर मुंबई (जिन्याखालची खोली), नटवर्य रंगमंच विरार (नारायणास्त्र), केईएस कॉलेज मुंबई (अलॉव मी), निर्मिती वसई (अम्मा), नाट्यस्पर्श आणि भवन्स कॉलेज, अंधेरी (टोपरं).

**१० डिसेंबर**–रंगसंगती मुंबई (सुमित्रा), एम.डी. कॉलेज मुंबई (पुंडलिका भेटी), खालसा महाविद्यालय, मुंबई (लोकल पार्लर), रेवन एंटरटेंमेंट, पुणे (हॅलो इन्स्पेक्टर), सीकेटी महाविद्यालय (स्वायत्त) नवीन पनवेल (काक्षी), ज्ञानसाधना महाविद्यालय ठाणे (उणिवांची गोष्ट).

# लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात मृदा दिन

## माझी वसुंधरा अभियानांतर्गत उपक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या वतीने 'माझी वसुंधरा ४.०' अभियानांतर्गत. मंगळवारी (दि. ५) जागतिक मृदा' दिनानिमित्ताने महापालिकेच्या लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयामध्ये जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला.




या वेळी महापालिकेचे पर्यावरण विभागप्रमुख मनोज चव्हाण, शिक्षण विभाग प्रशासन अधिकारी किर्ती महाजन, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुपमा डामरे व शिक्षकवर्ग उपस्थित होते. आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिकेच्या वतीने 'माझी वसुंधरा ४.०' अभियानांतर्गत पर्यावरण विभागाच्या वतीने विविध कार्यक्रम राबविले जात आहेत.

पर्यावरण विभाग उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या सूचनेप्रमाणे लोकनेते दि.बा पाटील विद्यालयामध्ये पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना जागतिक मृदा' दिनानिमित्ताने मातीचे महत्त्व, वसुंधरेचे महत्व सांगण्यात आले. तसेच प्लॅस्टिक उपवास, पर्यावरणीय बदल याबाबत माहिती सांगण्यात आली. याबरोबरच विद्यार्थ्यांनी एक तरी झाड दत्तक घ्यावे व त्याची जपोसना करावी पर्यायाने विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे दूत होण्यास सांगण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये आपल्या पर्यावरणाबद्दल जनजागृती निर्माण होण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम राबविण्यात आला.





**पनवेल : खारकोपर येथील ॐ श्री साई सेवा समितीच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही साई भंडारा व श्री सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली होती. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. त्यांचे आयोजकांच्या वतीने विघ्नेश घरत यांनी स्वागत केले. या वेळी गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, किशोर पाटील, महेश पाटील, स्वप्नील ठाकूर, नामदेव म्हात्रे आदी उपस्थित होते.**





**पनवेल : ओवळे ग्रामपंचायतीचे सरपंच रूपेश गायकवाड यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी दापोलीचे माजी उपसरपंच गजानन पाटील, युवा कार्यकर्ते अंकुश नाईक, अक्षय गायकवाड, सुदर्शन म्हात्रे आदी उपस्थित होते.**



**पनवेल : बामणडोंगरी सेक्टर १९ परिसरातील नागरिकांच्या मागणीनुसार तेथील तलावाची सफाई भाजपच्या वतीने करण्यात आली. या वेळी वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, मनोज गुलाब नाईक, अलंकार यशवंत म्हात्रे, कृष्णा सागदेवन, दयानंद, मयुर म्हात्रे आदी उपस्थित होते.**

# गुटख्याच्या ट्रकसह एकजण ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

कर्नाटक येथून मुंबईत आणला जात असलेला २० लाखांचा गुटखा पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी एकाला अटक केली असून चौघांवर तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंब्रा–पनवेल मार्गावरून प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक होणार असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यावरून कक्ष तीनचे वरिष्ठ निरीक्षक पराग सोनवणे यांच्या पथकाने धानसर टोलनाकालगत सापळा रचला होता. संशयित ट्रकमधील मालाची चौकशी करताना त्यात ४८ गोण्यांमध्ये प्रतिबंधित गुटखा आढळला. गुटख्यासह ट्रकही ताब्यात घेत चालक मोहमद खलील जमाल अहमद शेख याला पोलिसांनी अटक केली आहे. ट्रक चालक कर्नाटकचा असून तो कर्नाटक येथून मुंबईला घेऊन चालला होता. तत्पूर्वीच गुन्हे शाखा पोलिसांनी कारवाई करून तो ताब्यात घेतला. चालक मोहमद याच्यासह ट्रक मालक सय्यद दस्तगीर, फैजल सिद्धीकी व मुन्ना अशा चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे.




**उरण : संयुक्त ट्रान्सपोर्ट संघटनेच्या वतीने शहरातील चारफाटा येथे इको स्टॅन्ड सुरू करण्यात आले आहे. या टॅक्सी स्टॅन्डचे उद्घाटन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी भाजपचे तालुका अध्यक्ष रवी भोईर, जितू घरत, संघटेनचे अध्यक्ष निर्गुण कवळे, संघटनेचे सरचिटणीस हरप्रीत सिंग, कोषाध्यक्ष विकी पाटील, कुमार गोळे, विजय चाळेकर, अश्वीन अघमकार, जिल्हा अध्यक्ष आनंद गुरव, इस्माईल मुल्ला, गोपाळ व्यवहारे, सुदेश पाटील आदी उपस्थित होते.**

# अनाथ मुलांना सहलीतून मायेची ऊब

**पनवेल : वार्ताहर**

सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघाचे अध्यक्ष केशव राणे व उपाध्यक्ष प्रिया खोबरेकर यांनी सिंधुदुर्ग जिल्हा रहिवाशी हितवर्धक संघ महिला मंडळ यांच्या वतीने रविवारी (दि. ३) शांतीवन, नेरे, पनवेल येथे संघातील ज्येष्ठ नागरिक व कमल अर्णव चॅरिटेबल ट्रस्टच्या अनाथ मुलांची सहल आयोजित केली. या वेळी मंडळाच्या महिला, पुरुष व ज्येष्ठ सदस्यांनी शांतीवन वृद्धाश्रमाला उस्फुर्तपणे भेट दिली.



सिंधुदुर्ग कला सांस्कृतिक अकॅडमी तर्फे प्रसन्नकुमार घागरे आणि त्यांचे शिष्यवर्ग प्रिया खोबरेकर, राजश्री राणे, जया परब, सुरेखा पवार, रश्मी वाघाटे, संगीता पारकर, स्वप्ना राणे, भाई परब, सूर्यकांत देसाई, दीपक परब, संजय पवार यांनी सुमधूर, सुश्राव्य भक्तीगीतं गायली व रंगनाथ नेरुरकर, प्रभाकर येरम, संकेत पवार यांनी वाद्यांवर संगीत साथ दिली व संगीताचा कार्यक्रम बहारदार केला शांतीवनातील आजी–आजोबांनी त्यांचे संगीतमय मनोरंजन केल्याबद्दल सिंधुदुर्ग सांस्कृतिक कला अकॅडमीतील कलाकारांचे तसेच सिंधुदुर्ग जिल्हा रहिवाशी हितवर्धक संघाच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

सहलीला उपाध्यक्ष संतोष चव्हाण, बाबाजी नेरूरकर, अशोक चव्हाण, प्रिता भोजने, धनश्री धुरी, रमेश गवस, श्रद्धा माधव, अर्चना तावडे, स्वप्नाली देसाई, यश मोचेमाडकर, संतोष नेरूरकर, सचिन नेरूरकर, विनायक गवस, प्रशांत खोबरेकर, मनोहर मराळ, महेश मराळ व मंडळातील ज्येष्ठ सदस्य विद्या आदींनी सहलीच्या या कार्यक्रमाचा मनसोक्तपणे आनंद घेत कार्यक्रम उत्सहात पार पाडला.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते लॅपटॉप वर्ल्ड शाखेचे उद्घाटन



(छाया : अक्षय शार्दुल)



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दर्जेदार सेवा आणि मेहनतीच्या आधारावर लॅपटॉप वर्ल्ड सेल्स ॲण्ड सर्विस हे पनवेलकरांमध्येही लोकप्रिय होतील अशा शब्दात आमदार प्रशांत ठाकूर यांनी लॅपटॉप वर्ल्डच्या उद्घाटनावेळी शुभेच्छा दिल्या.

पनवेल एस.टी आगाराच्या मागे असलेल्या यशोनारायण अपार्टमेंटमध्ये सचिन टेकाळे आणि नितीन टेकाळे यांनी लॅपटॉप वर्ल्ड सेल्स ॲण्ड सर्विसची तिसरी शाखा नव्याने सुरू केली आहे. या शाखेचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. ४)झाले.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, चारुशीला घरत, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, अजय बहिरा, तेजस कांडपीळे, भाजपचे खारघर शहर सरचिटणीस दीपक शिंदे, मामा मांजरेकर, अजय माळी, उद्योजक इंद्रजीत नींबाळकर, उद्योजक कृष्णन कोणार, अक्षय लोखंडे, मारुती लोंढे, आदित्य हेडगे, अतुल पाटील, भरत जाधव, संतोष शर्मा, श्रीराम पवार, नितेश पाटील, बाळासाहेब टेकाळे, सचिन टेकाळे, नितीन टेकाळे आदी उपस्थित होते.

संपादकीय

# अपेक्षित बिघाडी

हिंदी भाषिक पट्ट्यातील मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तीन राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाचा दिमाखदार विजय झाल्यानंतर विरोधकांच्या इंडिया आघाडीत बिघाडी झाल्याचे दिसत असून काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखाली राजधानी दिल्लीत बोलावण्यात आलेली आघाडीची बुधवारची बैठक पुढे ढकलण्यात आली आहे. ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, नितीशकुमार आणि एम.के. स्टॅलिन आदी महत्त्वाची नेतेमंडळी बैठकीला उपस्थित राहू शकणार नसल्याने ही बैठक पुढे ढकलण्यात आली.

**आगामी लोकसभा निवडणुकांची सेमी फायनल मानल्या गेलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने मध्य प्रदेशची सत्ता राखली तर राजस्थान आणि छत्तीसगड ही दोन महत्त्वाची राज्ये काँग्रेस पक्षाकडून हिसकावून घेतली. काँग्रेसच्या या पराभवानंतर दोनच दिवसांत 'इंडिया आघाडी'तील काँग्रेसचे वजन कमी झाल्याचे स्पष्ट झाले असून पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री, तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री व समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी काँग्रेस पक्षावर लगेचच टीका केली. अपयशानंतर इंडिया आघाडीतील पक्ष काँग्रेसला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करणार हे अपेक्षितच होते. आगामी लोकसभा निवडणुकांवर डोळा ठेवूनच हे २८ पक्ष इंडिया आघाडीत एकत्र आले आहेत. आघाडीच्या स्थापनेनंतर काँग्रेसने आघाडीचे नेतृत्व स्वत:कडे घेतले. त्यानंतर लगेचच जागावाटप करण्याची मागणी तृणमूल काँग्रेस, आम आदमी पार्टी तसेच इतर काही पक्षांनी केली होती, परंतु पाच राज्यांच्या निवडणुकांनंतरच जागावाटपावर चर्चा करण्याची भूमिका काँग्रेसने घेतली. पाचपैकी काही राज्यांमध्ये निवडणुकीत यश मिळाल्यास अधिक जागांवर दावा करता येईल अशी काँग्रेसची अपेक्षा होती, परंतु प्रत्यक्षात काँग्रेसच्या पदरी अपयशच आल्यामुळे त्यांचे लोकसभा निवडणुकांच्या दृष्टीने केलेले अवघे नियोजन फसले. स्वाभाविकपणे आघाडीतील इतर पक्ष आता काँग्रेसला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करीत आहेत. जास्तीत जास्त जागा मिळाव्यात यासाठी आता आघाडीतील सारेच घटक पक्ष प्रयत्न करतील. त्यामुळेच काँग्रेसवर टीका करत बैठकीला येऊ शकत नाही, असे ममता बॅनर्जी तसेच अखिलेश यादव यांनी जाहीर केले. राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि तेलंगणा या राज्यांमधील विधानसभा निवडणुका काँग्रेसने स्वबळावर लढवल्या. आघाडीतील कुठल्याही पक्षाशी काँग्रेसने युतीबाबत चर्चा केली नाही. यावरूनच ममता बॅनर्जी यांनी आता काँग्रेसची कानउघाडणी केली आहे. विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसने जागावाटपाबाबत चर्चा केली नाही, त्यामुळेच तीन राज्यांमध्ये काँग्रेसचा पराभव झाला. आपण काँग्रेसला जागावाटपाचा सल्ला दिला होता हे नमूद करायला अर्थातच त्या विसरल्या नाहीत व आघाडीच्या बैठकीस जाणार नाही असे त्यांनी सोमवारीच ठणकावून सांगितले. त्यांच्या पाठोपाठ समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव आणि संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष व बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनीही आघाडीच्या बैठकीकडे पाठ फिरवली. एकुणात निव्वळ लोकसभा निवडणुकांवर डोळा ठेवून एकत्र आलेल्या विरोधकांच्या या आघाडीत ऐक्याऐवजी दुराव्याचेच प्रदर्शन झाले. त्यातच तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन हे चक्रीवादळामुळे बैठकीला उपस्थित राहू शकणार नाहीत हे स्पष्ट झाले. स्वाभाविकपणे आघाडीची बुधवारची बैठक पुढे ढकलण्यावाचून काँग्रेस पक्षासमोर काही पर्याय उरला नाही. आघाडीत आता नेतृत्वावरून आणखी वाद होतो की लोकसभा निवडणुकांचा विचार करून २८ पक्षांचे हे कडबोळे सामोपचाराने एकत्र येते हे येणारा काळच स्पष्ट करील.**


# युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर

सामाजिक समतेचे प्रणेते डॉ.भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेशातील महू या गावी झाला अन् जणू काही सामाजिक समतेचा क्रांतीसूर्य उदयास आला, कारण त्यांचा उदय हा गोरगरीब, निराधार, उपेक्षित अशा दलित-पददलित समाजाच्या जीवनातील अस्पृश्यतेचा अंधार नाहीसा करणारा तेजस्वी प्रकाशच ठरला. बाबासाहेबांचे वडील रामजी सुभेदार हे लष्करात नोकरीला होते, तर आई भीमाबाई यांचे भीमराव अवघ्या पाच वर्षांचे असतानाच निधन झाले. त्यामुळे बाबासाहेबांच्या मातेची छत्रछाया बालवयातच विरून गेली. अखेर वडील रामजी सुभेदार यांनी मोठ्या धैर्याने आई-वडिलांची दुहेरी भूमिका बजावून भीमरावांना लहानाचे मोठे केले. त्यासह त्यांना शिकवून समाजात ताठ मानेने उभे करण्यासाठी सर्वस्व पणाला लावले. अशा थोर रामजी सुभेदार अन् वंदनीय भीमाबाई यांनाही त्रिवार वंदन!

खरंतर शिक्षण पूर्ण करून रूढीप्रिय समाजातील जातीभेद-वर्णभेद समूळ नष्ट करणे हेच त्यांचे मुळ उद्दिष्ट होते. या पार्श्वभूमीवरच बाबासाहेबांनी मागास समाजाला शिका, संघटित व्हा अन् संघर्ष करा हा मंत्र दिला. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी आयुध असून त्याद्वारे आपल्याला घटनादत्त अधिकारांची अन् समाजाप्रती असलेल्या कर्तव्यांची जाणीव होते तसेच शिक्षण घेतल्यावर ती व्यक्ती विवेकी व विचारी होते असा संदेश त्यांनी मागास समाजाला दिला. यास्तव शिकाल तर टिकाल हेही त्यांनी मागास समाजाच्या सदस्यांना आवर्जून सांगितले.

इतकेच नव्हे; तर बाबासाहेबांनी स्त्री शिक्षणावर अधिक भर दिला. स्त्रिया शिकल्या तर त्या आपल्या मुला-मुलींवर चांगले संस्कार घडवू शकतात अन् पुढे समाजाचा सर्वांगीण विकास घडविण्यात भरीव योगदान देऊ शकतात यास्तव सर्वांत आधी त्यांना चूल अन् मूल या चौकटीतून बाहेर काढायला हवे हा मोलाचा विचार त्यांनी आपल्या बांधवांना दिला. शिक्षणामुळे माणसात न्यायाची चाड अन् अन्यायाची चीड निर्माण होते हे प्रत्येकाने ध्यानी ठेवावे असा उपदेश त्यांनी उपेक्षित घटकांना दिला. त्यामुळे मागासवर्गीयांमध्ये शिक्षणाची मोठी गोडी निर्माण होऊन ते शिकूनसवरून पुढे येऊ लागले. त्यांना आपल्या घटनादत्त अधिकारांची जाणीव होऊ लागली. वास्तवात हेच खरे बाबासाहेबांच्या सामाजिक क्रांतीचे फलित आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १९०८ साली रमाबाई धुत्रे (वलंगकर) यांच्याशी विवाह झाला. रमाबाई या सामाजिक चळवळीत आयुष्यभर बाबासाहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. सामाजिक तथा आर्थिक समस्यांवर त्यांनी मोठ्या धैर्याने मात करून त्या जीवनभर बाबासाहेबांची सावली बनून राहिल्या. त्यामुळे बाबासाहेबांना आपली सामाजिक समतेची लढाई जिंकण्यास पाठबळ मिळाले. अशा महान मातेचे २७ मे १९३५ रोजी दादर येथे निधन झाले. यशवंत भीमराव आंबेडकर हा त्यांचा सुपुत्र, तर प्रकाश आंबेडकर अन् आनंदराज आंबेडकर हे त्यांचे नातू. काळ लोटत गेला. दरम्यान, सन १९४८मध्ये बाबासाहेबांचा डॉ.सविता कबीर यांच्याशी दुसरा विवाह झाला. त्यांनीही आंबेडकरांना सामाजिक जीवनात मोलाची साथ दिली. शैक्षणिक जीवनाची वाटचाल करताना बीएची पदवी संपादन केल्यानंतर बाबासाहेब हे उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला रवाना झाले. त्यांना कोल्हापूर संस्थानचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि बडोदा संस्थानचे राजे सयाजीराव गायकवाड यांनी मोलाची मदत केली.



एमए, पीएचडी, एमएससी, डीएससी, एलएलडी, डी.लिट, बॅरिस्टर आदी तत्सम पदव्या बाबासाहेबांनी सखोल अध्ययन करून देश-विदेशातून संपादन केल्या. दलित-पददलित, अन्य मागासवर्गीयांना शिक्षणाची कवाडे उघडावी या प्रांजळ उद्देशाने त्यांनी सन १९४५मध्ये मुंबईत पीपल्स एज्युकेशन सोसायटीची, तर सन १९४६मध्ये सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना केली. या संस्थांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या स्कॉलरशिपची व्यवस्था केली. बाबासाहेब हे काही काळ मुंबईच्या सिडमहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. त्यानंतर बाबासाहेबांनी मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयात प्राचार्य म्हणून काम पाहिले. समाजातील गोरगरीब, गरजू, उपेक्षित घटकांना शिक्षण घेणे शक्य व्हावे यासाठी त्यांनी शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणले. इतकेच नव्हे तर बाबासाहेबांनी आपल्या दादर येथील राजगृहात मागास विद्यार्थ्यांसाठी अभ्यासयुक्त अशी ५० हजारांहून अधिक पुस्तके उपलब्ध करून दिली.

वास्तवात बाबासाहेब हे मागासवर्गीयांचे कैवारी होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वतंत्र देशाचा राज्यकारभार सनदशीर मार्गाने चालावा यासाठी भारतीय राज्यघटना तयार करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना सोपविण्यात आले. घटना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी त्यांना घटना मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करीत त्यात काही सदस्यांचा समावेश केला. बाबासाहेबांनी मसुदा समितीच्या सदस्यांसोबत विविध देशांचे दौरे करून तब्बल दोन वर्षे ११ महिने १८ दिवस काम केले अन् घटनेला अंतिम रूप दिले.त्यानंतर बाबासाहेबांनी या घटनेचा मसुदा डॉ. राजेंद्र प्रसाद यांना अंतिम मंजुरीसाठी पाठविला. त्याला २६ नोव्हेंबर १९४९ रोजी मान्यता मिळाली अन् लगेच आपल्या देशाचा राज्यकारभार २६ जानेवारी १९५०पासून सनदशीर मार्गाने सुरू झाला. त्यात ४१३ कलमे अन् १२ परिशिष्टांचा समावेश करण्यात आला आहे. ही राज्यघटना म्हणजे बाबासाहेबांनी देशाला दिलेली एक सुंदर भेट आहे. त्यात राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान व त्यांचे केंद्रीय मंत्री, सुप्रीम व हायकोर्टाचे न्यायाधीशांचे अधिकार व कर्तव्य, राज्यपाल, राज्याचे मुख्यमंत्री व त्यांच्या मंत्रिमंडळाचे अधिकार व कर्तव्य, राष्ट्रीय निवडणूक आयोग, राष्ट्रीय माहिती अधिकार आयोग, स्थानिक स्वराज्य संस्था आदी शासकीय संस्थांचे अधिकार व कर्तव्य यासंबंधीचे कायदे त्यात समाविष्ट करण्यात आले आहेत.

बाबासाहेब म्हणत, गौतम बुद्ध अन् महात्मा ज्योतिबा फुले हे माझे गुरू, तर विद्या-विनय-शील ही माझी दैवते आहेत. शतकानुशतके गुलामगिरीचे मुके जीवन जगणाऱ्या उपेक्षित समाजाची अस्मिता जागृत करून त्यांना बोलके करण्यासाठी बाबासाहेबांनी मुकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत ही वृत्तपत्रे सुरू केली. बाबासाहेब हे महान लेखक, साहित्यकार, संपादक, पत्रकार होते.

बाबासाहेबांनी महाड येथील चवदार तलाव लोकचळवळ उभारून दलितांसाठी खुला केला तसेच नाशिकचे काळाराम मंदिर, अमरावतीचे अंबादेवी मंदिर व पुण्याचे पार्वती मंदिर येथे दलितांना प्रवेश देण्यासाठी बाबासाहेबांनी तीव्र जनआंदोलन उभारले अन् अखेर त्यात यश मिळून या मंदिरांमध्ये पददलितांसाठी प्रवेश खुला झाला. या सर्व घटनांमुळे बाबासाहेबांचे मन उद्विग्न झाले. देशात पसरलेल्या जातीभेद, वर्णभेदच्या विषवल्लीमुळे त्यांना अतीव दुःख झाले. त्याची परिणती म्हणजे बाबासाहेबांनी आपल्या पाच लाख अनुयायांसह १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर बौद्धधर्माची दीक्षा घेतली.

देशभरातील दुर्लक्षित-उपेक्षित घटकांना राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कर्तव्य तन-मन-धनाने बजावून अखेर ६ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेबांनी जगाचा निरोप घेतला. तत्पूर्वी यांनी घटनेच्या माध्यमातून देशात सामाजिक समता प्रस्थापित करून अस्पृश्यतेचे निर्मूलन केले. वास्तविक पहाता हीच खरी त्यांच्या मानवतावादी जीवनाची ओळख आहे. वंदनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली!

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान सामाजिक योगदानाला त्रिवार वंदन करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृतज्ञतेच्या भावनेतून २६ नोव्हेंबर हा दिवस साऱ्या देशात संविधान दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. याशिवाय इंदू मिल येथील डॉ.बाबासाहेबांचे स्मारक केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने विकसित केले जात आहे. बाबासाहेबांच्या महान सामाजिक कार्याची हीच खरी पावती आहे. अशा या महामानवाला महापरिनिर्वाण दिनानिमित्त भावपूर्ण अभिवादन!

**-रणवीरसिंह राजपूत, सदस्य, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, ठाणे**



## बदलते तंत्रज्ञान

## टेलिग्रामचे 'हे' शानदार फिचर्स होणार लाँच

सध्याच्या काळात सर्व जण सोशल मीडियाचा वापर करतात. हे दैनंदिन कामामधील एक अविभाज्य घटक बनले आहे. आपण सोशल मीडियामध्ये इन्स्टाग्राम, यूट्यूब, फेसबुक, एक्स, व्हॉट्सअॅप आणि टेलिग्रामचासुद्धा वापर करतो. हे सर्वच अॅप्स वापरकर्त्यांसाठी काही ना काही नवीन फिचर्स किंवा नवीन अपडेट घेऊन येत असतात. आता टेलिग्राम वापरकर्त्यांसाठी हटके फिचर लाँच करणार आहे.



नवीन अपडेटसह, टेलिग्राम आता प्रीमियम सदस्यांना लोगोसह प्रोफाईलसाठीसुद्धा रंग निवडण्याचा पर्याय देते आहे, ज्यामुळे प्रोफाइल आणखी आकर्षक दिसेल. तुमच्या अँड्रॉईड फोनमध्ये प्रोफाईल कस्टमाईज करण्यासाठी सेटिंगमध्ये जा. सेटिंगमध्ये 'चॅट सेटिंग हा पर्याय तुम्हाला दिसेल. त्यानंतर तुम्ही 'रंग बदला' या पर्यायावर टॅप करा तसेच आयओएस वापरकर्त्यांनी युवर कलर हा पर्याय सेटिंगमध्ये शोधा.

टेलिग्राम अॅप अपडेट इतर युजर्सच्या अकाउंट आणि आवडीच्या चॅनेलवरून स्टोरी रिपोस्ट करण्याची परवानगी देणार आहे. वापरकर्ते स्टोरीमध्ये ऑडिओ, मजकूर आणि व्हिडीओ आदी गोष्टी रिपोस्ट करू शकतात. या स्टोरी रिपोस्ट करण्यासाठी सेटिंगमध्ये जावे लागेल. त्यानंतर शेअर रोवर टॅप करा आणि 'स्टोरी रिपोस्ट करा' हा पर्याय निवडा. एखादी व्यक्ती स्वतःच्या स्टोरी कोणी शेअर केल्या पाहिजेत यावर मर्यादा ठेवू शकते. तसेच सगळ्यांसाठी व्हिजीबल असणाऱ्या स्टोरी फक्त रिपोस्ट केल्या जाऊ शकतात.

जेव्हा वापरकर्ते अॅपमध्ये एका विशिष्ट चॅनेलमध्ये जॉईन होतात तेव्हा अॅप वापरकर्त्यांना काही समान चॅनेलची यादी दर्शवेल आणि या यादीमध्ये फक्त सार्वजनिक चॅनेल दिसतील.

प्रीमियम सदस्यांसाठी मर्यादित असलेले 'व्हॉइस-टू-टेक्स्ट ट्रान्स्क्राइब' टेलिग्राम फिचर आता विनामूल्य वापरकर्त्यांसाठीसुद्धा घेऊन येत आहे तसेच ज्या वापरकर्त्यांकडे प्रीमियम नाही ते दर आठवड्याला फक्त दोन व्हॉइस आणि व्हिडीओ मेसेज ट्रान्सस्क्राईब करू शकतात.

टेलिग्रामने एक नवीन फिचर आणले आहे, ज्यात वापरकर्त्यांना स्टोरीमध्ये व्हिडीओ मेसेज पोस्ट करण्याचीसुद्धा परवानगी देणार आहेत तसेच हा व्हिडीओ मेसेज तुम्ही तुमच्या अॅप स्क्रीनवर कोणत्याही ठिकाणी ठेवू शकता आणि त्याचा आकारही बदलू शकता. रिपोस्ट केलेल्या स्टोरीवर प्रतिक्रिया देण्यासाठीसुद्धा या फिचरचा वापर करू शकता.

# कवी नारायण वामन टिळक



निमित्त

फुला-मुलांचे कवी व संतकवी म्हणून प्रसिद्ध असलेले रेव्हरंड नारायण वामन टिळक यांची आज जयंती. त्यांचा जन्म ६ डिसेंबर १८६१ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील करंजगाव येथे. बालपणाचा काही काळ तेथेच गेला. शिक्षण कल्याण व नाशिक येथे इंग्रजी पाच इयत्तांपर्यंत झाले. तेथील वास्तव्यात गणेशशास्त्री लेले यांच्याकडे त्यांनी संस्कृताचे अध्ययन केले. तेथे काव्याची गोडी लागली. आई जानकीबाई यांना पद्यरचनेची आवड होती. तिच्यापासून आपणास काव्यशक्ती लाभली अशी टिळकांची श्रद्धा होती.

१८८०मध्ये मनूताई गोखले-पुढे स्मृतिचित्रे हे मराठीतील उत्कृष्ट आत्मचरित्रात्मक पुस्तक लिहून प्रसिद्धीस आलेल्या लक्ष्मीबाई टिळक यांच्याशी विवाह झाला. पुढे अकरा वर्षे नागपूर, वणी, मुंबई, मुरबाड इ. ठिकाणी कीर्तनकार, पुराणिक, शिक्षक, जुळारी असे विविध प्रकारचे व्यवसाय केले. १८९३मध्ये नागपूर येथील बुटी या श्रीमंत गृहस्थांच्या आश्रयाने निघालेल्या व स्वधर्मपरिज्ञानास वाहिलेल्या ऋषि या मासिकाचे संपादन केले. पुढे राजनांदगाव येथे नोकरीनिमित्त जात असता एका ख्रिस्ती गृहस्थाची गाठ पडली आणि ते ख्रिस्ती धर्माचा अभ्यास करू लागले. त्या धर्मावर पूर्ण श्रद्धा बसल्यानंतर १८९५मध्ये ते ख्रिस्ती झाले व आमरण त्या धर्माचे कार्य त्यांनी केले. हे त्यांचे कार्यही वैशिष्ट्यपूर्ण होते. भजन, कीर्तन, पुराणादी धर्मप्रसाराचे आणि धार्मिक उद्बोधनाचे भारतीय मार्ग त्यांनी पुरस्कारिले. ते स्वतः भजन-कीर्तने करीत व इतर ख्रिस्ती बंधूंना कीर्तनाची साथ देत, मार्गदर्शन करीत. 'रेव्हरंड' ही ख्रिस्ती धर्मातील उपाधीही त्यांना मिळाली. 'रेव्हरंड टिळक' या नावाने ते महाराष्ट्रात ख्यात होते. त्यांच्या धर्मांतरानंतर त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनीही ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला.

रेव्हरंड टिळक हे कवी म्हणून प्रसिद्ध असले तरी त्यांनी स्फुट गद्यलेखनही विपुल केलेले आहे. प्रथम हिंदू धर्मास अनुकूल आणि पुढे ख्रिस्ती धर्मपुरस्कारार्थ त्यांनी केलेल्या लेखनाचा त्यात अंतर्भाव होतो. ज्ञानोदयाचे ते संपादकही होते. केशवसुतांच्या आधी त्यांनी काव्यरचनेस आरंभ केला. प्रथम जुन्या पद्धतीच्या, दीर्घ कथनपर काव्यरचनेवर त्यांचा भर होता. तथापि पुढे केशवसुतांच्या नव्या, आधुनिक कवितेचे वातावरण निर्माण झाल्यानंतर त्या प्रकारची कविता लिहिण्याकडे त्यांची प्रवृत्ती झाली. साधी, सहज रचना आणि प्रामाणिक भावनोत्कटता हे त्यांच्या काव्यरचनेचे विशेष होते. त्यांनी विविध विषयांवर आपल्या कविता लिहिल्या. तथापि एक प्रकारची व्यापक कुटुंबवत्सलता त्यांच्या एकूण कवितेला व्यापून राहिल्याचे जाणवते. त्यातूनच बालोद्यानमधील त्यांची शिशुगीते लिहिली गेली. दत्तांसारख्या कवींना त्यांनी दिलेले प्रोत्साहन व बालकवींचे स्वतःच्या घरात उत्कट जिव्हाळ्याने केलेले पालन या संदर्भात बोलके ठरते. निसर्गाबद्दल त्यांना प्रेम वाटे. 'फुलामुलांचे कवी' म्हणूनच ते ओळखले जातात. 'गुलाब', 'शुष्क गुलाब', 'रानात एकटेच पडलेले फूल', 'वनवासी फूल' ह्यांसारख्या कविता त्यांनी लिहिल्या आहेत. तथापि त्यांच्या कवितेतून अवतरणारी फुले ही निखळ निसर्गाविष्कारासाठी येत नाहीत, तर बोधप्रवण तत्त्वचिंतनासाठी येतात.

भारतीय ख्रिस्ती समाजात पुराणाची पद्धत लोकप्रिय करण्याच्या दिशेने त्यांचा हा एक प्रयत्न होता. तथापि त्याचे पहिले साडेदहा अध्यायच ते पूर्ण करू शकले. नंतरची काव्यरचना त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई आणि पुत्र देवदत्त यांनी पूर्ण केली. ख्रिस्ती झाल्याने टिळकांचा मायदेशाचा आणि मायभाषेचा अभिमान सुटला नाही. महाराष्ट्रात ख्रिस्ती झालेल्या लोकांची भाषा व साहित्य मराठीच राहण्यास टिळकांचे लेखन बरेच कारणीभूत झालेले आहे. मुंबई येथे ९ मे १९१९ रोजी ते निधन पावले.

**-रा. श्री. जोग (विकासपीडिया)**

क्लिक...क्लिक...!



**नवी मुंबई : ऐरोली से. १५ येथील महापालिकेचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक अल्पावधीतच नावाजले जाऊ लागले आहे.**

## आरोग्य प्रहर

## संतुलित जीवनशैली हेच आरोग्याचे सूत्र

आरोग्यदायी जीवनशैली राखणे हे सर्वांगीण आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. आजारांवर नियंत्रण ठेवून ते दूर ठेवण्यासाठी जीवनशैलीला शिस्त लावणे आवश्यक आहे. हृदयविकार, मधुमेह व रक्दाब हे आजार अकाली मृत्यूला कारणीभूत ठरत असून योग्य आहार पद्धती, व्यायाम व योग्य जीवनशैलीमुळे या आजारांना दूर ठेवण्यास मदत होऊ शकते. याविषयी दिल्लीतील केअर हॉस्पिटल्सच्या आहारतज्ज्ञ डॉ. जी. सुषमा यांच्या हवाल्याने सविस्तर माहिती दिली आहे.



डॉ. सुषमा यांनी स्पष्ट केले आहे की, पुरुष आणि महिलांना वेगवेगळ्या अशा विशिष्ट पौष्टिक गरजा असू शकतात, जसे की पुरुषांच्या आरोग्यासाठी विशिष्ट जीवनसत्त्वे आणि खनिजे महत्त्वाची असतात. त्याचप्रमाणे स्त्रियांना जास्त लोह आवश्यक असू शकते. विशेषतः मासिक पाळी आणि गर्भधारणेदरम्यान.

आहारतज्ज्ञ भक्ती आडकर यांनी नमूद केल्याप्रमाणे पौष्टिक आहार हा जीवनशैलीशी संबंधित आजारांचा धोका कमी करण्यासाठीचा मोठा आधारस्तंभ आहे. जीवनशैलीतील आजारांसाठी खराब आहार, शारीरिक हालचालींचा अभाव व उच्च तणाव पातळी जबाबदार ठरते, मात्र योग्य पोषणयुक्त आहार घेतल्यास खालील आजारांवर नियंत्रण ठेवता येऊ शकते.

चांगले आरोग्य राखण्यासाठी नियमित व्यायाम करणे अत्यंत आवश्यक आहे. व्यायामामुळे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधीचे आरोग्य सुधारते. मधुमेहाचा धोका कमी होतो आणि वजन नियंत्रणासाठी मदत होते. प्रत्येक आठवड्यात किमान १५० मिनिटे व्यायाम करण्याचे लक्ष्य ठेवा.

जास्त प्रमाणात मद्यपान हे हृदयाच्या समस्या, यकृताचे आजार व विशिष्ट कर्करोगाचा धोका वाढवतो. त्यामुळे मद्यपान लगेच बंद करा.

धूम्रपानामुळे श्वासोच्छवासाच्या समस्या, हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी रोग आणि काही प्रकारचे कर्करोग होण्याचा गंभीर धोका असतो. त्यामुळे धूम्रपान लगेच बंद करा.

दीर्घ काळापर्यंतचा ताण अनेक आरोग्याच्या समस्यांशी निगडित आहे. नियमित व्यायाम, पुरेशी झोप व आहारात संतुलन राखणे यांसारख्या सवयींमुळे तणाव कमी होतो. अशा प्रकारे ताणाचे व्यवस्थापन केले पाहिजे.

धान्य, फळे, भाज्या, मांस संतुलित आहार घ्या. बाहेरचे प्रक्रिया केलेले पदार्थ, साखर व मीठ यांचे प्रमाण मर्यादित करा. त्यामुळे वजन नियंत्रणात राहून लठ्ठपणाची समस्या दूर होईल.

# रोहा, पेणमध्ये भाजपच्या विजयाचा जल्लोष

**धाटाव : प्रतिनिधी**

नुकत्याच विधानसभा निवडणुकीत राजस्थान मध्यप्रदेश व छत्तीसगड महत्त्वाच्या तीन राज्यात भाजपने विजय संपादित केला. या विजयाचा फटाक्याची आतिष बाजी व पेढे भरून रोहा तालुक्यातील कार्यकर्त्यांनी राम मारुती चौक येथे आनंदोत्सव साजरा केला.

महाराष्ट्रातसुद्धा एन.डि.ए. आघाडीची सत्ता ही येणारच आहे. त्यामुळे निश्चितच या रायगडात भाजपची वाढलेली ताकद हे लक्षात घेता रायगडसह रोह्यात आगामी सर्व निवडणुकीमध्ये क्रमांक एकचा पक्ष असेल, असे मत भाजपचे रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांनी व्यक्त केले.

भाजपचे रोशन चाफेकर, विलास डाके, वैभव कुळकर्णी, निलेश धुमाळ, मिलिंद झुरे, सनल कुमार, श्रद्धा घाग, जयश्री भांड, ज्योती कुमार, रिया कासार, संगिता फाटक, अनिल घरजाळे, सचिन मोरे, राकेश चाफेकर, रोहित रोठे, परेश चितळकर, शुभम मोहिते, शुभम पतंगे, रितेश कीर्तने, मच्छिंद्र मोरे, अक्षय भायतांडेल सह भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





**पेण : प्रतिनिधी**

तेलंगणा वगळता राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड याठिकाणी भाजपला मोठे यश प्राप्त झाले, या निकालाचा जल्लोष ठिकठिकाणी पाहायला मिळत होता.

पेण तालुक्यातही भाजपच्या वतीने हा विजय साजरा करण्यात आला. पेण नगर परिषदेसमोर कोतवाल चौकात भाजप कार्यकर्त्यांनी फटाके वाजवून, पेढे वाटून आपला आनंद व्यक्त केला. या वेळी भाजपच्या बाजूने घोषणाबाजी करत या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. या वेळी माजी आमदार धैर्यशील पाटील, विधानसभा अध्यक्ष प्रसाद भोईर, माजी गटनेते अनिरुद्ध पाटील, युवा नेते ललित पाटील, भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, माजी उपनगराध्यक्ष दिलीप लाड, कांदळे सरपंच मुरलीधर भोईर, परशुराम पाटील, काशिनाथ पाटील, हितेश पाटील, प्रकाश रामाने, जयवंत म्हात्रे, प्रभाकर पाटील, अजय क्षीरसागर, प्रशांत पाटील, आदित्य पाटील, मितेश शहा आदी उपस्थित होते.

# महाडमध्ये ट्रॅक्टरचा टायर फुटून एकाचा मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

ट्रॅक्टरच्या टायरमध्ये प्रेशरने पाणी भरत असताना ट्रॅक्टरचा टायर फुटल्याने गंभीर जखमी होऊन एकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना महाड शहराजवळील सुंदरवाडी येथे सोमवारी (दि. ४) घडली आहे.

जावेद अब्दूल समद ठाणगे (वय ३९) असे मयत व्यक्तीचे नाव असून तो महाड शहराजवळील साहिलनगर मोहल्ला येथील रहिवासी होता. मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गालगत सुंदरवाडीजवळ समृद्धी सर्व्हिसिंग सेंटर येथे सोमवारी एका ट्रॅक्टरच्या टायरमध्ये प्रेशर पाईपने पाणी भरत असताना प्रेशर प्रमाणापेक्षा जास्त झाल्याने टायर फुटला आणि त्यात जावेद गंभीररित्या जखमी झाला. या घटनेत कानाला व छातीला गंभीर दुखापत झाल्याने त्यास ग्रामीण रुग्णालय महाड येथे उपचारासाठी दाखल केले असता कान व नाकातून अति रक्तस्त्राव झाल्याने त्याचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला.

या घटनेची नोंद महाड शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलीस निरीक्षक मिलींद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे.


## कर्जत नगरपरिषद, कर्जत, जि. रायगड
## जाहीर सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या उक्त ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडाचा प्रकार | झाड तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | नितीन नंदकुमार सावंत | टाकळा–०२, आंबा–०१, नारळ– ०१, भेडी–०१ जांबूळ ०१, जंगली– ०१ | बांधकामात अडथळा होत असल्याने |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्षा अधिकारी कर्जत नगरपरिषद इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही सूचना हरकती असल्यास ही जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आंत लेखी स्वरूपात या कार्यालयास कळवावे.

सही/–
मुख्याधिकारी तथा वृक्षा अधिकारी
कर्जत नगरपरिषद, कर्जत



(जलसंपदा विभाग, शासन निर्णय, क्रमांक, निविदा–०४१७/(प्र.क्र. २४७/१७) मोप्र–१/दि:–१८/१०/२०२३)

निविदा सूचना

## महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड, पिन नं–४०२१०७ यांचे कार्यालय

ई मेल पत्ता:– eehmpd@rediffmail.com eehmpd2021@gmail.com, दूरध्वनी–०२१४३–२७८०११

**ई निविदा सूचना क्र. ११ सन २०२३–२४**

कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता ब–१ नमुन्यातील ई–प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय किंमत | ई–निविदा उपलब्ध कालावधी | ई–निविदा उघडणे | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | हेटवणे धरण येथे सुरक्षेच्या दृष्टीने सानुकुलीत उपायासह IOT आधारीत डेटा ट्रान्समिशन सिस्टीम पर्यायी पावर बॅक अप आणि स्मार्ट इंटेलिजेंट इंटरफेस कनेक्टीविटी व स्मार्ट इंटेलिजेंट रिकॉनिसन्स सिस्टम सह पुरविणे, बसविणे, कार्यान्वित करणे. | ५०,८३,५६७/– | दिनांक ०८/१२/२०२३ ते २२/१२/२०२३ | दिनांक २६/१२/२०२३ | संदर्भित तांत्रिक कामातील सक्षम अनुभवी नोंदणीकृत व सक्षम कंत्राटदार |
| २ | हेटवणे धरणावर सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा रक्षक पुरविणे | ११,५४,८२२/– | | | रायगड जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सुशिक्षित बेरोजगार नोदणीकृत कंत्राटदार |

खालील ठिकाणी ई– निविदा बाबत सर्व माहीती उपलब्ध आहे.

१) संकेतस्थळ http://mahatenders.gov.in
(सदर निविदे सुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२) कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली–पेण कार्यालयातील सूचना फलक.

सही/–
(इंजि. दि. का. राजभोज)
कार्यकारी अभियंता,
हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली
ता. पेण जि. रायगड

जा.क्र.हेमप्रवि/लेशा–१/ई–निविदा सुचना / २३१३/२०२३
हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड,
दिनांक :– ०४/१२/२०२३

विमाका/कोवि/२०२३–२०२४/२३६



## महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ९३ सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन–४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी–१ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे मढेगांव नवशी रस्ता ग्रा. मा. ४० तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ४००५२७३ | ४१००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच व वरील |
| २ | मौजे मोरगिर फौजदारवाडी रस्ता ग्रा.मा. ८९ तयार करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | ३९६८१०४ | ४०००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच व वरील |
| ३ | बोरज फाटा चाळीचा कॉड, गुडेकरकॉड, कोडबेंकोंड रस्ता ग्रा. मा. १० मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | ३९६५५७८ | ४०००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच व वरील |
| ४ | दिवील ते हावरे रस्ता ग्रा. मा. १५८ मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | ३९६३६४४ | ४०००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच व वरील |
| ५ | कुरवडे वडगांव रस्ता ग्रा. मा. ३५ मध्ये सुधारणा करणे, तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ३२०२१७२ | ३३००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच व वरील |
| ६ | चरई रेडेखेचर रस्ता ग्रा.मा. ११२ मध्ये सुधारणा करणे, तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | ३१७३९६२ | ३२००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच व वरील |
| ७ | ओबळी गावदेवी मंदिर रस्ता ग्रा.मा. १६१ मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | २३७९०२१ | २४००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ८ | दादली किंजळघर जोडरस्ता ग्रा.मा. २५८ मध्ये सुधारणा करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | १६१४५७२ | १७००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ९ | मोरगिरी बौध्दावाडी रस्ता डांबरीकरण करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | १६२८९३९ | १७००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १० | मौजे मूर खालची आळी ग्रा. पं. देवळी येथे सामाणिक सभागृह बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (आ. स्था. वि.) | १६८६१९४ | १७००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ११ | वाकण गावठाण रस्ता ग्रा.मा. २६ मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | १५९२७३० | १६००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच व वरील |
| १२ | किनेश्वर ते किनेश्वरवाडी रस्ता ग्रा. मा. १४ मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | १५९२५७४ | १६००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १३ | मौजे मोहोत वडघर भिसेवाडी रस्ता ग्रा.मा. १४८ तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (५०५४, ०४) | १४७३९८० | १५००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सहा व वरील |
| १४ | मौजे मोरेवाडी ग्रा.पं. निगडे ता. महाड येथे रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (डोंगरी विकास कार्यक्राम २०२२–२३) | १२११८३९ | १३००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सहा व वरील |
| १५ | मौजे रूपवली ग्रा. पं. रुपवली ता. महाड येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड (डोंगरी विकास कार्यक्राम २०२२–२३) | १२२०२५५ | १३००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सहा व वरील |
| १६ | मेघरे ग्रुप ग्रामपंचायत मेघरे, ता. श्रीवर्धन येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड (खा.स्था. वि.) | १२७०४१२ | म.स.स | ५९०/– | ६ महिने | म.स.स |
| १७ | मौजे कोकबल (ठाकरोली विभाग) ता. म्हासळा येथे सामाजिक सभागृह बांधणे. (खा. स्था. वि.) | १२६५६८८ | म.स.स | ५९०/– | ६ महिने | म.स.स |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०७/१२/२०२३** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१५/१२/२०२३** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. **१८/१२/२०२३** वेळ ११.०० वाजता |

**टिप :–** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

सही/
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५५०९
दिनांक : ०४/१२/२०२३


वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर


## वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना

(फक्त सभासदांकरिता)

दिनांक : ०१/११/२०२३

**प्रति,**
**मा. सभासद..........................................................यांस.**
**रा................................................... ता. पनवेल**

**महोदय,**

आपणास कळविण्यात येते की, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाची अठ्ठावीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २३ डिसेंबर २०२३ रोजी सायंकाळी ०४:०० वाजता रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. १ व २, सेक्टर १६ अे, उलवे नोड, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेस उपस्थित राहून आपण सहकार्य करावे हि विनंती.

### सभेपुढील विषय :-

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२) मागील सर्वसाधारण सभेपासून आजपर्यंत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या संचालक मंडळाने घेतलेल्या महत्वाच्या निर्णयांना व त्यावर केलेल्या कार्यवाहीला मंजूरी देणे.
३) मागील सर्वसाधारण सभेपासून आजपर्यंत रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस् कॉम्प्लेक्सविषयी घेतलेल्या धोरणात्मक महत्वाच्या निर्णयांना व त्यावर केलेल्या कार्यवाहीला मंजूरी देणे.
४) श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे २०२२–२०२३ या वर्षाचे हिशेब तपासनिसांनी प्रमाणित केलेले जमाखर्च, ताळेबंद व हिशेब वाचून मंजूर करणे.
५) सन २०२३ २०२४ या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे व संम्मत करणे.
६) सन २०२३– २०२४ या वर्षा करिता हिशेब तपासनिसांची नेमणूक करणे.
७) श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस् कॉम्प्लेक्सच्या नियम आणि नियमावली दुरुस्तींना मान्यता देणे.
८) सन २०२३–२४ ते २०२७–२८ या कालावधी करिता श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या नविन कार्यकारी मंडळाची निवड करणे.
९) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेस आलेल्या विषयांवर चर्चा करणे.

आपला विश्वासू
सही/–
प्रशांत ठाकूर
अध्यक्ष
श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ

**विशेष सूचना :**

१) गणसंख्येच्या अभावी हि सभा तहकूब झाल्यास पुन्हा ती सभा त्याच जागी अर्ध्या तासानंतर वरील कामकाजासाठी भरेल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) ज्या सभासदांना अहवाल व जमा खर्चाची अधिक माहिती हवी असेल त्यांनी ती लेखी स्वरुपात संस्थेच्या कार्यालयात सभेपूर्वी सात दिवस आधी कळवावी. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा अगर सूचनांचा विचार करण्यात येणार नाही.
३) संस्थेच्या सभासदांनी त्यांचे बदललेले पत्ते संस्थेस लेखी स्वरुपात कळवावे.

प्लॉट क्र. ४७५, मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड. फोन : ०२२–६४५२९५२५



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ९२/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | रानसई पाणीपुरवठा योजना.. रानसाई धरणाच्या ओव्हरफ्लो सेक्शनची विशेष दुरुस्ती, ऊर्जा अपव्यय व्यवस्था, गाईड भिंतीची तरतूद, ड्रेनेज पाईपलाईनचे स्थलांतर आणि विस्तारीकरण करणे. | ₹ २१,९८,४२,०१४.०० |
| २. | पेण अलिबाग रिजन व नागोठाणे औद्योगिक क्षेत्र.. पोयनाड व नागोठाणे येथील भांडारगृहात भारतीय मानक २६०/१९६९ नुसार ८ टक्के द्रवरुप एल्युमिनियम सल्फेटचा (लोहमुक्त) पुरवठा करणे. | ₹ १,४३,०१,०००.०० |
| ३. | महाड औद्योगिक क्षेत्र पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. नांगलवाडी येथील सावित्री नदीवरील जुन्या केटी विअर येथे सन २०२३-२४ साठी पाणी साठवण व्यवस्था करणे. | ₹ ७,६६,१५७.०० |
| ४. | रोहा औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. रोहा औद्योगिक क्षेत्रातील ए, २ रा क्रॉस व ३ रा क्रॉस रस्त्यालगतच्या खराब झालेल्या सी.आय. जलवितरण वाहिन्या बदलणे. | ₹ ३९,५१,४१६.०० |
| ५. | खांदा कॉलनी पनवेल येथील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरुस्ती.. खांदा कॉलनी पनवेल येथील प्रशासकीय इमारतीमध्ये मेकॅनिकल मोबाईल कॉम्पॅक्टर स्टोरेज पुरवणे आणि बसवणे. | ₹ ४०,२१,९२४.०० |
| ६. | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती.. पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील निवासी झोनमधील मोकळा भूखंड क्रमांक ओएस–१ ला कंपाऊंड भिंत बांधणे व विद्यमान कंपाऊंड भिंतीची उंची वाढवणे. | ₹ ३९,८१,२०२.०० |
| ७. | रोहा पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. रोहा पाणीपुरवठा योजनेच्या जॅकवेल येथे अतिरिक्त एसएस ३०४ स्ट्रेनरचा पुरवठा करून बसविणे व विद्यमान स्ट्रेनर बदण्यासह अनुषंगिक कामे करणे. | ₹ १४,५७,५८३.०० |
| ८. | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.. वाघिवली खाडीमध्ये साखळी क्र. ६.०० कि.मी ते ६.२५ कि.मी. दरम्यानच्या ६३० मि.मी. व्यासाच्या सांडपाणी निःसारण वाहिनीची तातडीची दुरुस्ती करणे. | ₹ ४०,०९,३२०.०० |

उपरोक्त अ.क्र. १ वरील कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०६/१२/२०२३ ते दिनांक ०२/०१/२०२४ पर्यंत व अ.क्र. २ ते ८ वरील कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०६/१२/२०२३ ते दिनांक २०/१२/२०२३ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त अ.क्र. १ वरील कामाबाबत दिनांक १८/१२/२०२३ पूर्वी व अ.क्र. २ ते ८ वरील कामांबाबत दिनांक ११/१२/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा अ.क्र. १ वरील कामाबाबत दिनांक २२/१२/२०२३ पासून व अ.क्र. २ ते ८ वरील कामांबाबत दिनांक १४/१२/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# निवडक

## सरकारी योजनांबाबत वाशीत शिबिर

**नवी मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अशा अनेक योजना आहेत, ज्यांचा लाभ लोकांना मिळू शकतो, मात्र या सर्व योजनांची संपूर्ण माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत नसल्याने नागरीक अनभिज्ञ असतात. हे लक्षात घेऊन नवी मुंबईतील जनतेला या योजनांचा लाभ मिळावा यासाठी शिवाजीराव भोस्कर फाऊंडेशनतर्फे दोन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वाशी सेक्टर २ मध्ये याचे उद्घाटन आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते झाले. या वेळी आयोजक प्रताप भोस्कर तसेच नागरीक उपस्थित होते. या वेळी भाजपचे नवी मुंबई उत्तर भारतीय सेलचे अध्यक्ष राजेश राय यांच्यासह अनेक मान्यवर तसेच वाशी येथील सर्व भाजप कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



## दिव्यांग बांधवांचे स्नेहसंमेलन



**नवी मुंबई :** भारतीय जनता पक्ष, नवी मुंबई दिव्यांग सेलतर्फे 'जागतिक अपंग दिनानिमित्त' सोमवारी (दि. ४) सर्व दिव्यांगांच्या स्नेहसंमेलनाचे आयोजन दिव्यांग संयोजक ॲड. निरंत पाटील व इतर सहकार्यांनी केले होते. या वेळी सर्व दिव्यांगांना जीवनावश्यक वस्तूंचे, कुबड्या व खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी जिल्हाध्यक्ष संदीपजी नाईक यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या वेळी आमदार गणेश नाईक, भाजपचे जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी नगरसेवक केशव अंकल, गिरीश म्हात्रे, संदीप म्हात्रे, आत्माराम पाटील, मिलिंद पाटील, यशवंत म्हात्रे, बाळाराम पवार, संकल्प पाटील, सौरव पाटील, पृथ्वी कडू आदी उपस्थित होते.

## 'परिवहन कर्मचाऱ्यांना सुविधा द्या'



**नवी मुंबई :** महापालिका परिवहन उपक्रमातील वाहक, चालक आणि कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या संदर्भात शिवसेना कामगार सेनेचे नवी मुंबई प्रमुख प्रदीप वाघमारे यांच्या नेतृत्वात परिवहन उपक्रमाचे कॅफो तुषार दौडकर यांना निवेदन देण्यात आले. या वेळी शिवसेनेचे माजी नगरसेवक मनोहर जोशी, संघटनेचे महादेव गोरे, शहाजी दबडे,भाष्टे, पाटील इत्यादी पदाधिकारी उपस्थिती होते. या वेळी पगारवाढ व्हावी, गणवेश व शिलाई भत्ता मिळावा, पी एच व मेडिक्लेम रजा मिळावी तसेच आगारातील कॅन्टीन सुरू करण्यात यावी यासह अन्य विषयावर चर्चा करण्यात आली.

# नवी मुंबईत डास प्रादुर्भाव नियंत्रण उपाय

## महापालिकेकडून फवारणी व धुरीकरण मोहीम





**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात डास प्रादुर्भाव नियंत्रण ठेवण्याकरिता नियोजित साप्ताहिक वेळापत्रकानुसार डासअळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरण कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जातो. याकरिता नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पूर्ण कार्यक्षेत्राचा विचार करुन साप्ताहिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येते, जेणेकरुन प्रत्येक कार्यक्षेत्रात आठवड्यातून एकदा फवारणी व धुरीकरण करता येईल.

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्राची भौगोलिक रचना लक्षात घेता नागरी वस्तीलगत असणारा खाडी किनारा व त्यालगत असणारा दलदलीचा परिसर यामध्ये हिवाळा कालावधीमध्ये डासांची घनता वाढण्याच्या दृष्टीने पोषक वातावरण असल्याने या कालावधीत इतर कालावधीपेक्षा जास्त डास प्रादुर्भाव जाणवतो. परिणामी सदर कार्याक्षेत्रालगतच्या नागरी वस्तीमधून डास प्रादुर्भावाच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त होत असतात.

यामुळे नागरिकांना डासांचा त्रास जाणवू नये या उद्देशाने महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली डास प्रादुर्भाव कमी करण्यासाठी १ नोव्हेंबर २०२३ ते २४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.यामध्ये सायंकालीन डास घनता सर्वेक्षण करण्यात येत असून या अंतर्गत नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर प्रत्येक गुरुवारी आरोग्य सहाय्यक यांच्या पर्यवेक्षणाखाली सायंकालीन डास घनता निरीक्षण करण्यात येत आहे.

या कार्यवाहीसोबत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांच्या अधिपत्याखाली आरोग्य सहाय्यकांमार्फत पर्यवेक्षण सायंकाळी ५:३० ते ६ वाजता सुरू करण्यात येते व त्या दिवसाचे नियोजित फिलींग पूर्ण होईपर्यंत करण्यात येते. सकाळचे धुरीकरण हे साप्ताहिक वेळापत्रकानुसार नियोजित कार्यक्षेत्रामधील बंद गटारांमध्ये केले जाते तसेच सायंकालीन धुरीकरण गावठाण, झोपडपट्टी व सोसायटी अंतर्गत मीटर रुम, जीने याठिकणी पंधरवडा कार्यक्रमानुसार राबविले जाते. १ नोव्हेंबर २०२३ ते २४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत सायंकालीन धुरीकरण करण्यास आठवड्याकरिता ४६४ अतिरिक्त धुरीकरण फिलींगनुसार नियोजन करण्यात आले असून या फिलींग्सचा वापर सायंकालीन धुरीकरणाच्या पंधरवडा वेळापत्रकानुसार केला जाणार आहे.

### नागरिकांना आवाहन

नागरिकांनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या नमुंमपाच्या आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे व धुरीकरणाविषयी काही तक्रारी असल्यास नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रास संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# एड्स प्रतिबंधक दिनानिमित्त विविध उपक्रम



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका आरोग्य विभागाच्या वतीने राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम २४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ सार्वजनिक रुग्णालये व २ माता बाल रुग्णालयांमार्फत राबविण्यात येत आहे.

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात वाशी, ऐरोली व नेरूळ ही ३ सार्वजनिक रुग्णालये तसेच माता बाल रुग्णालय तुर्भे व कोपरखैरणे येथे सन २००२ पासून आयसीटीसी केंद्र कार्यान्वित असून सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे अँन्टी – रिट्रोव्हायरल थेरपी (एआरटी केंद्र) सन २००९ पासून कार्यान्वित आहे. याठिकाणी नमुंमपा कार्यक्षेत्रातील तसेच नमुंमपा क्षेत्राबाहेरील उपचारार्थ येणाऱ्या रुग्णांची एचआयव्ही तपासणी, त्यांचे समुपदेशन आणि मोफत औषधोपचारांची नियमित सेवा दिली जाते.

दरवर्षी १ डिसेंबर रोजी जगभरात जागतिक एड्स दिन साजरा करण्यात येतो. यावर्षी १ डिसेंबर २०२३ रोजी संपन्न झालेल्या जागतिक एड्स दिनाचे घोषवाक्य 'समाजाच्या पुढाकाराने करू एच आय व्ही अथवा एड्सचा समूळ नाश' हे होते. त्यानुसार राष्ट्रीय एड्स कार्यक्रमांतर्गत एड्सचा समूळ नाश करण्याचे ध्येय नजरेसमोर ठेवण्यात आले असून त्यासाठी समाजाचा पुढाकार अपेक्षित आहे.

या अनुषंगाने १ डिसेंबर २०२३ रोजी नमुंमपा क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात आले व जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला. यामध्ये महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाच्या वतीने निबंध व चित्रकला स्पर्धा, रॅली, महाविद्यालयांमध्ये जनजागृती, पथनाट्य तसेच आहारतज्ज्ञ यांच्यामार्फत रुग्णांना आहाराबाबत मार्गदर्शन, रुग्णांना फळ वाटप व समुपदेशन अशा विविध कार्यक्रमांचे मोठ्या प्रमाणावर आयोजन करण्यात आले.

जागतिक एड्स दिनानिमित्त HIV-TB समन्वय अंतर्गत एनटीईपी मध्ये उत्कृष्ट काम केल्याबद्दल नवी मुंबई महानगरपालिकेस व्दितीय क्रमांक प्राप्त झाला असून सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. या व्यतिरिक्त सार्वजनिक रुग्णालय, वाशी आयसीटीसी यांना प्रथम क्रमांक व सार्वजनिक रुग्णालय नेरुळ आयसीटीसी यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाला असून सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.

### एचआयव्हीबाधितांना पाठिंबा देण्याचे आवाहन

जागतिक एड्स दिनानिमित्त नागरिकांनी आपली एचआयव्ही स्थिती जाणून घ्यावी तसेच एचआयव्हीचा कलंक आणि भेदभाव याविरुद्ध ठामपणे उभे राहून एचआयव्हीबाधित समुहाला पाठिंबा द्यावा असे आवाहन करण्यासोबतच याबाबतच्या अधिक माहितीसाठी १०९७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे नवी मुंबई महापालिकेच्या वतीने सूचित करण्यात येत आहे.

# वाशीच्या मिनी सीशोर येथे संगीतमय कार्यक्रम



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील संगीत रसिकांसाठी म्युझिक गॅलेक्सी ग्रुपतर्फे वाशीच्या मिनी सीशोर येथे नुकतेच नवीन आणि जुन्या चित्रपटगीतांसह रंगतदार कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

वाशीच्या मिनी सीशोअरच्या परिसरात माजी महापौर अविनाश लाड यांनी लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य व क्रीडाविषयक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मात्र येथे रोज येणाऱ्या लोकांसाठी संगीताशी संबंधित कोणतीही सोय नव्हती. हे लक्षात घेऊन या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन अविनाश स्लाईडच्या हस्ते उक्त मिनी समुद्रकिनारी तलावाच्या मधोमध बांधलेल्या बँड स्टँडवर करण्यात आले.

म्युझिक गॅलेक्सी ग्रुपचे संचालक विलास भगत यांच्या नेतृत्वाखाली गायक महेश घाटे, रवींद्र गाजुळे, दिलीप मिश्रा, अनिल अरोरा, राजेश काका, श्री ब्रिजेश, गायिका नयना गाजुळे, निर्मला काटेकोला आणि विशाखा कांबले यांनी. नवीन आणि जुनी फिल्मी गाणे सादर करून श्रोत्यांची मंत्रमुग्ध केले.

या वेळी ज्येष्ठ पत्रकार विनोद प्रधान, अनिल अग्रवाल यांच्यासह अनेक संगीतप्रेमींची विशेष उपस्थिती होती.

# पनवेल मनपा क्षेत्रातील विकासकामांचा आढावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या विविध विभागातील विकास कामांचा आढावा मंगळवारी (दि. ५) मुख्यालयात झालेल्या बैठकित प्रशासक तथा आयुक्त गणेश देशमुख यांनी घेतला. या वेळी विकास कामे जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबधित विभागास दिल्या.

या वेळी उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त गणेश शेटे, सहाय्यक संचालक नगररचना अधिकारी ज्योती कवाडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, सुधीर सांळुखे, राजेश कर्डिले यांच्या सह पालिकेतील सर्व विभांगाचे विभाग प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

या वेळी महापालिका भरती परीक्षेच्यादृष्टीने करण्यात आलेल्या तयारीचा आढावा आयुक्तांनी घेतला. दिनांक ८,९,१०,११ डिसेंबर रोजी महापालिका भरती परीक्षा महाराष्ट्राच्या सहा प्रशासकिय विभागांमध्ये होणार आहे. यासांठी महापालिकेने परिपूर्ण नियोजन केले आहे. त्या अनुषंगाने येणाऱ्या विविध विषयांवरती या वेळी चर्चा करण्यात आली.

याबरोबरच महापालिकेच्या गाडयांसाठी वर्कशॉप बांधणे, शवविच्दछेदन गृहासाठी जागा देणेबाबत सिडकोकडे पाठपुरावा करणे, बावन्न बंगला येथे रिटेनिंग वॉल बांधणे, महापालिका हद्दीतील ५७ बाजार विकसित करणे, सिडकोकडील भूखंड हस्तांतरण करणे, कळंबोली येथील ७२ खाटांचे रूग्णालय उभारणे, नवीन कर्मचाऱ्यांच्या बैठक व्यवस्थेबाबत नियोजन करणे, महापालिका हद्दीतील सर्व उड्डाणपूलांचे सौंदर्यीकरण करणे, या कामांचा आढावा घेऊन कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासक तथा आयुक्त गणेश देशमुख यांनी आज झालेल्या विभागप्रमुखांच्या बैठकीत दिल्या.



**उलवे नोड : पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालात तीन राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाने बाजी मारली आहे. भाजपच्या या विजयाबद्दल उलवे नोड येथे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.**

# अनिता भगत व सहकाऱ्यांच्या प्रवेशामुळे उसर्लीत भाजपला आणखी बळ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उसर्ली ग्रामपंचायतीमधील शेकापच्या सरपंच अनिता भगत यांच्यासह ग्रामपंचायतीचे सदस्य, माजी सरपंच, माजी उपसरपंचांनी भारतीय जनता पक्षाचे विकासाचे कमळ हाती घेतले आहे. यांच्या पक्षप्रवेशामुळे येथील भाजपला आणखी बळ मिळाले आहे.

विचुंबे येथे झालेल्या कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व प्रवेशकर्त्यांचे पक्षाची शाल देऊन पक्षात स्वागत केले. यामध्ये सरपंच अनिता भगत, सदस्य मुकेश दिलीप भगत, अरुण वाघमारे, नितीन भगत, माजी उपसरपंच जितेंद्र भगत, माजी सरपंच मनीषा वाघमारे, हेमंत भगत, मधुकर भगत, वसंत भोईर, गणेश भगत, संतोष भोईर, रमेश कोलाडकर, लक्ष्मण धोद्या, हरेश भगत, अक्षय भगत, अभिषेक भगत, अक्षय पाटील, रमेश भगत, नितेश भगत, मयुरेश भगत, राजू रोडे, आकाश रणीवळे, परशुराम पाटील, सिद्धार्थ भगत, रुपेश हरेश भगत, रोहन भगत, गजेंद्र चिमणे, सोनू सावंत, उशुफ लदाब, मैहबुभ लदाब, दीपमाळा हेमंत भगत, मनीषा जितेंद्र भगत, समीक्षा मुकेश भगत, संगीता गजेंद्र चिमणे, सुरेखा रमेश भगत, शुभांगी भगत, रेखा गणेश गावडे, भाग्यश्री गणेश भगत, मिलन संतोष भोईर, आशा हरेश भगत, सुनंदा परशुराम पाटील, पूजा अक्षय पाटील, मृण्मयी अक्षय भगत, काजल अभिषेक भगत, अजगर बेगम युसूफ लदाब, संगीता बच्चे, नीता निकम, रागिणी पाटील, अंकिता जाधव, वनिता रसाळ, वैशाली ठाकूर, योगिता कोंडावले, तेजश्री बोरकडे, सुवर्णा सुवारे, ममता मोहिते, अर्जुन बच्चे, दिनेश देवरुखकर, हर्षल कांबळे, रोहन रसाळ, गोपीचंद दळवी, सुभाष जाधव, अनिल वानखडे, गौतम साळवी, मिलिंद खरात, योगेश दळवी, प्रथमेश साडविलकर, बाळू चोपडे, सुनील आमकर, महेंद्रसिंग पाटील, सतिश खिलारी, सुरेश रेवाळे स्वप्निल शिर्के, नागेश म्हामुनकर, चंद्रकांत काकडे, निलेश साळवे, रूपेश नागावकर, जितेंद्र कदम नारकर, संजय सुपेकर, सिद्धेश शिंदे, सुरेंद्र ठाकूर, नितेश कांबळे, प्रबोध पडते, महेश कासरूंग, अशोक हांडे, अशोक कदम, अक्षय कदम, सुनील रेवाळे, सुभाष कांबळे, प्रशांत आदित्य कासरूंग, अमोल रहाटवळ, चंद्रशेखर गोरीवले, कैलाश शिंदे, तान्हाजी शिंदे, आरहंत कुशलवर्धन, रवींद्र रेवाळे, निलेश कोरडे, विलास जाधव, विनोद जाधव, नीता खिलारी, रोहिणी ठाकूर, लतिका शिंदे, साक्षी कांबळे, शिवाजी देवकर, बाळासाहेब माने, संजय पाटील, उमेश देवरे, बजरंग कुठे, नितीन देवकर, विठ्ठल पवार, प्रताप गलांडे, तुकाराम पवार, संजय जगदाळे, अक्षय पवार, विकास पाटील, ज्योतीराम जगदाळे, नितीन जाधव, सचिन जाधव, चंद्रहार दबडे, महादेव गायकवाड, हरिदास रणसिंग, तुळशीराम कोकरे, सुरेश कासारे, सदाशिव गायकवाड, नितीन होळकर, सुनील पवार, दिनकर खराडे, घोटणकर, प्रमोद काळे, साळवे, गणेश हस्पे, सुरज गलांडे, आशिष पवार, उमेश देवरे, किरण धोंडगे, गिरीश बांदल, प्रवीण पवार, अमोल घोलप, दत्ताराम सागवेकर, अमोल गायकवाड, वैभव गायकवाड, अजय सुपेकर, रवींद्र जामदार, अमर कदम, सागर शास्त्री, गजानन तांबे, निलेश कोरडे, बाब्रुवाहन यादव, शैलेश महामुनकर, अक्षय कांबळे, प्रदीप पवार, शशिकांत नर, जितेंद्र कासेकर, सतीश कुंभार, आकाश सोनवणे, विश्वास सावंत, रोहिदास रांजणे, प्रमोद लकीमले, सतीश कुंभार, जयवंत पोसम, प्रवीण गुरव, सत्यम खेडेकर, जितेश शेट्टी, सागर विधाते, संजय सुपेकर, हरिश्चंद्र कदम, भिमराव बर्डे, निलेश धांडे, गुप्ता, निलेश ठाकूर, विनोद कोंडावले, नवनाथ बोरकडे, रावसाहेब मगर, मनोहर सुवारे, राजेश पवार, अभिजित मोहिते, धीरज दहातोंडे, अर्जुन पोटफोडे, राजू दहातोंडे, स्वप्निल पवार, अर्जुन काळे, राजु रोडे, चांदणी रोडे, राहुल रोडे, अनिता संदिप रोडे– आई, रमाताई साहेबराव जोगदंड, परेश जोगदंड, समिक्षा जोगदंड, लक्ष्मण कांबळे, ललिता कांबळे, देविदास कांबळे, रेखा देविदास कांबळे, महावीर जावळे, सोनाली जावळे, जित जावळे, अनिरुद्ध कदम, निकेश कदम, आकाश पाटेकर, प्रदिप जाधव, रुपेश खैर, सुनिल महाडिक, प्रशांत साळवे, मिराताई रोडे, प्रनिता प्रविण रोडे, प्रवीण रोडे, प्रिती सोनावणे, अनंता सोनावणे, प्रियांका रूके, आकाश रूके, पुजा कांबळे, राजु कांबळे, पायल कांबळे, उषाताई गुंडेवार, आकाश गुंडेवार, रवि वानखेडे, अनिता वानखेडे, उमेश चवुलकर, नरेश जाधव, सुभाष कांबळे, नितेश जाधव, नयन जाधव यांनी भाजपमध्ये पक्षप्रवेश केला आहे.

## निवडक

### स्व. दत्ताजीराव तटकरे यांची जयंती



**धाटाव :** कोलाड येथील द. ग. तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्राचार्य सुखदेव तिरमले यांच्या पुढाकाराने स्व. दत्ताजीराव तटकरे (अण्णा) यांची साजरी करण्यात आली. या वेळी आंबेवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच व शाळा समितीचे प्रमुख सुरेश महाबळे यांनी अण्णांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. प्राचार्यांनी स्व. अण्णा यांच्या ग्रामीण लोकांसाठी केलेल्या विकासकामांमुळेच आज त्यांचे नाव आदराने घेतले जाते, असे सांगितले, तर महाबळे यांनी स्व. अण्णांनी केलेले कार्य व त्यांच्या पश्चात त्यांचा मुलगा खासदार सुनील तटकरे व त्यांचा नातू आमदार अनिकेत तटकरे, नात मंत्री आदिती तटकरे हे अतिशय मेहनतीने पुढे चालवत आहेत, असे सांगितले.

### सायली सदावर्ते राज्य निरीक्षकपदी



**रोहे** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना युवती सेना महाराष्ट्र राज्य निरीक्षकपदी (कोकण विभाग) सायली सदावर्ते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याआधी सदावर्ते यांनी रोहा शहर, तालुकाप्रमुख, रायगड जिल्हाप्रमुख पदावर काम केले आहे. या कालावधीत तरुणाईचे अनेक प्रश्न, समजोपयोगी कार्यक्रम तसेच शिवसेनेच्या आंदोलनांत सक्रिय सहभाग घेतला. या कार्याची दखल घेत त्यांची राज्य निरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

### माणगावात मोफत नेत्रतपासणी शिबिर

**माणगाव** : येथे शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन बुधवारी (दि.१३) सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत पेपर विक्रेते नितीन मेथा सभागृह जुने एसटी स्टँड माणगाव या ठिकाणी करण्यात आले आहे. मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांनी सोबत आधार कार्ड व रेशन कार्ड याची झेरॉक्स प्रत आणावी. मधुमेहाची व रक्तदाबाची औषधे सुरू असल्यास तीदेखील घेऊन यावीत. रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी जाण्याची, राहण्याची, जेवणाची व परत आणून सोडण्याची मोफत सोय आहे. शिबिरात सहभागी होणाऱ्यांनी नावनोंदणीकरिता विधिता मनीष मेथा (८६९८७४०६४०), सुप्रिया शिंदे (९०४९६६५५९८) यांच्याशी संपर्क साधावा.

# मिसिंग लिंकमुळे मुंबई-पुणे अंतर, कोंडी होणार कमी


**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बोरघाटाला पर्यायी मार्ग म्हणून मिसिंग लिंक तयार होत आहे. यामुळे मुंबई आणि पुणेमधील अंतर आठ किलोमीटरने कमी होणार असून वीकेण्डला होणाऱ्या वाहतूक कोंडीची कटकटही संपणार आहे. त्याचप्रमाणे अपघातही घटतील.

एक्स्प्रेस वेवर खालापूर टोलनाका ते बोरघाट हद्दीत सर्वाधिक अपघात होत आहेत. यावर पर्याय म्हणून ६६९५.३७ कोटी रुपये खर्चून मिसिंग लिंक साकारत आहे. त्याचे काम प्रगतिपथावर असून खालापूर टोलनाक्यापासून चौथ्या मार्गिकेचे काम सुरू आहे. सध्या सहा पदरीमध्ये दोन मार्गिकांची भर पडणार आहे. त्यामुळे हा मार्ग आठ पदरी असणार आहे.

मिसिंग लिंकसाठी ऐतिहासिक चावणी गावाच्या हद्दीत वायर लूप पद्धतीच्या पुलाचे काम सुरू आहे. दरी खोऱ्यातून जाणाऱ्या पुलाची जमिनीपासूनची उंची १३५ मीटर, तर पुलाची लांबी ६४५ मीटर असणार आहे. याशिवाय ९००मीटर लांबीचे दोन समांतर पूल असणार आहेत. द्रुतगती मार्गावर तीन पुलांना चौथ्या मार्गिकेत समांतर पूल बांधण्यात येत आहेत, तर डोंगराच्या पोटात १५० मीटर खालून दोन समांतर बोगद्यांचे काम सुरू आहे. त्यापैकी बोगद्याचा अडीच किलोमीटरचा भाग लोणावळ्यातील धरणाच्या खालून जाणार आहे. बोगदा क्रमांक १.७५ किलोमीटर लांबीचा असून त्याला समांतर बोगदा असणार आहे. दुसऱ्या बोगद्याची लांबी ८.९२ किलोमीटर असून या बोगद्यालासुद्धा समांतर दुसरा बोगदा असेल. बोगद्याची रूंदी २१.४५ मीटर आहे.

मिसिंग लिंक खालापूर टोलनाका ते थेट लोणावळा हद्दीत सिंहगड कॉलेज असा असणार आहे. ऑफकॉन कंपनी मिसिंग लिंकचे काम करीत असून नवयुग इंजिनिअरींग बोगद्याचे काम करीत आहे. अवजड आणि महाकाय यंत्राच्या साह्याने सुरू असलेले हे काम अजून वर्षभर तरी चालणार असल्याने प्रवाशांना २०२४पर्यंत वाट पहावी लागणार आहे.



### प्रकल्पाचे फायदे

**सर्वाधिक अपघाताचा टप्पा वगळला जाणार असून बोरघाटात कायम दरडीचा असलेला धोका मिसिंग लिंकवर नसेल. घाटाचा होणाऱ्या वाहतूक कोंडीतून सुटका होऊन अंतर कमी झाल्याने प्रवासाची २० ते २५ मिनिटे वाचतील.**

### * केबल पुलाची उभारणी

*भारतातील पहिला केबल पूल, पुलाची उंची १३५ मीटर, लांबी ६४५ मीटर*

### * बोगद्याचे वैशिष्ट्य

*भारतातील पहिला २१.४५ मीटर रूंदीचा बोगदा असून प्रत्येक तीनशे मीटरवर बोगद्याला बाह्यमार्ग असेल. त्यामुळे काही आपत्ती आल्यास बोगद्यात अडकून बसावे लागणार नाही.*

## वावेपोटगे येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन

### नागरिकांनी मानले आमदार महेंद्र दळवींचे आभार

**रोहे : प्रतिनिधी**

कार्यतत्पर आमदार महेंद्र दळवी यांच्या माध्यमातून विघ्नेश माळी यांच्या सहकार्यातून रोहे तालुक्यातील वावेपोटगे येथे विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला होते. या विकासकामांचे भूमिपूजन वावेपोटगे येथे शिवसेनेचे तालुकाप्रमुख अॅड. मनोज शिंदे, ज्येष्ठ नेते मोतीराम गिजे, सरपंच शारदा गिजे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास उपसरपंच स्वप्नील ठाकूर, शेणवईच्या सरपंच प्रगती देशमुख, भातसईचे माजी सरपंच गणेश खरीवले, विक्रांत देशमुख, धीरज खरीवले, मदन गीजे, द्वारकानाथ देशमुख, राक्षीकर, सदानंद शेळके, रामा झुरेकर, प्रदीप मोरे, लक्ष्मण मोरे, सर्वेश मोरे, गणेश निकम, जीवन देशमुख, महेश दिवकर, दीपक गीजे, प्रशांत गीजे, नितेश गीजे कैलास गीजे, रीना गीजे, दत्ताराम खामकर, मनोहर पारेकर, सीमा गीजे, भारती खांडेकर, मंदा गीजे, नामदेव काटकर, किसन ठाकूर, दत्ताराम घाणेकर, रामू जाधव, गणेश पवार, मदन वाघमारे आदी उपस्थित होते.

या वेळी वावेपोटगे व वावेखार येथे २६ गाव नळ पाणीपुरवठा योजना अंतर्गत कामाचे, जलसंधारण बंधारा, स्मशानभूमी रस्ता, अलिबाग ते वावेखार रस्ता, मुकुंद गीजे यांचे घर ते आदिवासी वाडी डांबरीकरण, चंद्रकांत घाणेकर यांच्या घराजवळील रस्ता, वावेपोटगे हनुमान मंदिर येथे पेव्हर ब्लॉक, वावेपोटगे व्यायामशाळा पेवर ब्लॉक, स्मशानभूमी संरक्षण भिंत आदी कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

वावेपोटगे हद्दीत विविध कामांसाठी लाखो रुपयांचा विकास निधी आमदार महेंद्र दळवी यांच्या माध्यमातून मिळाल्याने त्यांचे ग्रामस्थांच्या वतीने आभार मानण्यात आले. या कार्यक्रमास ग्रामस्थ, तरुण मंडळ, महिलावर्ग, आदिवासी बांधव उपस्थित होते.

**कार्यसम्राट आमदार महेंद्र दळवी यांच्या माध्यमातून ग्रामपंचायत हद्दीत मोठ्या प्रमाणात विकासकामे करण्यात येत आहेत. ग्रामपंचायतीचा विकास हाच आमचा ध्यास आहे.**

**-शारदा गिजे,**
**सरपंच, वावेपोटगे ग्रामपंचायत**



## सायगावमध्ये मुलाने केली आईची हत्या

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील सायगाव येथे पोटच्या मुलाने आईची निर्घृण हत्या केल्याची घटना घडली. आरोपीने वडिलांच्या डोक्यातपलंगाच्या फळीने फटका मारून त्यांनाही जखमी केले आहे.

आरोपी राजेश रमेश शिर्के (३२) याने आई रेखा रमेश शिर्के (५३) हिच्या डोक्यावर, तोंडावर व पायावर पलंगाच्या फळीने फटके मारून तिची हत्या केली, तर वडिलांनाही जखमी केले. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr.No | Tender/Notice No. | Particulars of Tender | Esti. Cost |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:- EE/EHV (O&M)/DIVN/MHD/Tech/E -Tender No.37/2023- 24 Dtd.06.12.2023 RFX No. 7000029273** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for providing services of 06 Nos. of skilled person (Tech.I & Asstt. Tech) against vacancies at 220 KV Kandalgaon S/s, 220 kV Vilebhgad S/s, 100 KV Mhasala S/s & KTL S/Dn. Mahad under EHV (O&M Dn. Mahad for the period 01.12.2023 to 31.03.2024. | **Rs.5,83,0941- (Including GST)** |
| 2. | **Tender No:- EE/EHV (O&M)/DIVN/MHD/Tech/E -Tender No.38/2023- 24 Dtd.06.12.2023 RFX No. 7000029275** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for providing 01 Nos. of Ferrule Printer Machine at 220 KV Kandalgaon Substations under EHV (O&M) Dn. Mahad | **Rs.91,128/- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST+1% Labour CESS. Bid submission is from 06.12.2023 @ 00:00 hrs to 12.12.2023 @23:59 Hrs for above tender. For further details visit our website:-**https://srmetender.mahatransco.in** **Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089 Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV(O&M) Dn. Mahad**


# रोहा प्रेस क्लबच्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

### १५१ दात्यांनी केले रक्तदान

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यातील प्रेस फोटोग्राफर कै. जनार्दन शेडगे यांच्या स्मरणार्थ रोहा प्रेस क्लब व कै. जनार्दन शेडगे मित्र मंडळ यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात १५१ पिशव्या रक्त जमा झाले.

शिबिराच्या प्रारंभी कै. जनार्दन शेडगे यांना मंडळाचे अध्यक्ष अरुण करंबे, प्रेस क्लबचे अध्यक्ष राजेंद्र जाधव यांच्यासह उपस्थितांनी श्रद्धांजली वाहिली. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस विजय मोरे, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, रोहा तालुका सिटीझन्स फोरमचे अध्यक्ष नितीन परब, निमंत्रक आप्पा देशमुख, महेश सरदार, विलास कुलकर्णी, उस्मान रोहेकर, राजेश काफरे, शैलेश रावकर आदी उपस्थित होते. शिबिरासाठी रोहा प्रेस क्लब अध्यक्ष राजेंद्र जाधव, कार्यक्रम समिती प्रमुख सुहास खरीवले, परिषद प्रतिनिधी शशिकांत मोरे, सरचिटणीस रवींद्र कान्हेकर, माजी अध्यक्ष नरेश कुशवाह, नंदकुमार बामुगडे, उद्धव आव्हाड, श्याम लोखंडे, नंदकुमार मरवडे, अल्ताफ चोरडेकर, संदीप सरफळे, सागर जैन, जितेंद्र जाधव, शरद जाधव, समीधा अष्टीवकर, सचिन शेडगे, विश्वजित लुमण, दिनेश जाधव, अंजुम शेटे, रविना मालुसरे, सिद्धेश ममाले, सचिन साळुंखे, पराग फुकणे, कल्पेश पवार आदींसह प्रेस क्लब व मित्र मंडळाने विशेष परिश्रम घेतले. शासकीय रक्तपेढीचे डॉ. दीपक गोसावी व त्यांच्या टीमने रक्त संकलन केले.




महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
<u>मुदतवाढ सूचना</u>

**ई निविदा सूचना क्र. ८२/२०२३-२०२४ (मुंबई) करीता**

दिनांक ०१/१२/२०२३ रोजी दैनिक नवराष्ट्र, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई,दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता कंत्राटदारांचे प्रश्न, कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलास व ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | शहापूर धेरंड औद्योगिक क्षेत्र ... शहापूर धेरंड औद्योगिक क्षेत्रासाठी चौपदरी सिमेंट कॉक्रीट पोहोच रस्ता बांधणे, औद्योगिक क्षेत्रांतर्गत दुपदरी सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे, आरसीसी बांधीव गटर, पूल, बॉक्स कल्व्हर्ट इत्यादीचे बांधकाम करणे व पथदिवे उभारणे तसेच संलग्न कामे करणे. (दुसरी मागणी) |

सदर कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक १३/१२/२०२३ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ०७/१२/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. उपरोक्त कामाकरीता कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ११/१२/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतक कोणताही बदल करण्यात आलेला नाही.


# आंबट-चिंबट हिवाळी रानफळे बहरली

**माणगाव : प्रतिनिधी**

हिवाळा सुरू झाला की, सर्वांना वेध लागतात ते थंडीच्या दिवसांत खायला मिळणाऱ्या विविध रानफळांचे. उन्हाळ्यात ज्या प्रमाणे रानावनात आंबे, जांभूळ, काजू आदी रानफळे खावयास मिळतात तसाच हिवाळ्यातही विविध रानफळांना बहर येत असतो. यामध्ये आवळा, बोरे, चिंच, बोंडे आदी फळांचा समावेश होतो. चवीला गोड नसणारी आंबट, तुरट वर्गात मोडणारी ही फळे सर्वांच्या पसंतीस पडत आहेत.

थंडीच्या मोसमातील पौष्टिक व आरोग्यवर्धक फळे प्रसिद्ध आहेत. थंडीचे हे दिवस रानबोरांसाठी प्रसिद्ध आहेत. काटेरी अशा बोराच्या झाडांवर आढळणारी फळे पक्क होण्यास सुरुवात झाली असून बाजारात पाच ते दहा रुपयांना पुरचुंडीमध्ये ती विकली जात आहेत. या बीमध्ये असणारा गरही चविष्ट असतो. बोरांप्रमाणेच या दिवसात आंबट-चिंबट अशा चिंचांचा मोसम सुरू झाला आहे आकडेवाल्या, लांबसडक चिंचांनी झाडे लगडलेली दिसून येत आहेत. याच दिवसातील चिंचांचा स्वाद घेणे, मिठासोबत खाणे अनेक जण पसंत करतात. चिंचेचा कोळ, चिंचोके विकण्याच्या उद्योगातून अनेक कुटुंबांना अर्थाजनही होते.

बाजारात आवळा उपलब्ध झाला आहे. भरपूर प्रमाणात जीवनसत्व देणारा आवळा १०० ते १५० रुपये किलोने विकला जात आहे. आवळ्याचा पेठा, लोणचे, च्यवनप्राश बनविण्याकडे गृहिणींनी पसंत दिली आहे. हिवाळ्याच्या दिवसांत रानात मिळणारे फळ म्हणजे बोंडे होत. या झाडावर हिवाळ्यात होणारे हे फळ खायला तुरट असते, परंतु उन्हामध्ये पूर्ण वाळवल्यानंतर याच्यामध्ये येणारा गोडवा अवर्णनीय असतो. आदिवासी बांधवांना या फळांचा मळा तयार करून चांगले अर्थाजन मिळते. या फळाप्रमाणेच रानावनात आमटीची फळे, काळेटीची फळे तयार झाली असून खास रानमेवा ती प्रसिद्ध आहेत.





**हिवाळ्यातील रानफळे तयार झाली असून रानफळांचा गोडवा आणि चव खवय्यांच्या जिभेवर कायम रेंगाळत असते. खास आंबट चवीसाठी ही फळे प्रसिद्ध आहेत.**

**-नयन दसवते,**
**स्थानिक नागरिक**

**बोरे, आवळा, चिंच, बोंडे इत्यादी रानफळांना बाजारात विक्रीसाठी चांगली मागणी आहे. वाट्यावर, किलोप्रमाणे ही फळे विकली जातात. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाला हातभार लागतो.**

**-रऊफ बागवान,**
**विक्रेता, माणगाव**

# हार्दिकच्या तंदुरुस्तीसाठी खास प्लान



## बीसीसीआय आणि एनसीएची विशेष आखणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्याला यंदाच्या विश्वचषक स्पर्धेदरम्यान दुखापत झाली. त्यानंतर तो या स्पर्धेत खेळू शकला नाही. आता मीडिया रिपोर्ट्समध्ये असे समोर आले आहे की, हार्दिक पंड्या पुढील १८ आठवडे संघाबाहेर राहणार आहे. हार्दिकची दुखापत लवकरात लवकर बरी करण्यासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आणि राष्ट्रीय क्रिकेट अकादमी (एनसीए) यांनी १८ आठवड्यांची विशेष योजना कार्यक्रम तयार केला आहे.

२०२४ ते २०२६दरम्यान हार्दिक पांड्याने तंदुरुस्त राहावे यासाठी बीसीसीआयने 'हाय परफॉर्मन्स प्रोग्राम' नावाची योजना आखली आहे. वृत्तानुसार बीसीसीआय आणि एनसीएने हार्दिकसाठी १८ आठवड्यांचा कार्यक्रम तयार केला आहे, ज्यामध्ये मार्चपर्यंत त्याचे दररोज मूल्यांकन केले जाईल. यामध्ये स्ट्रेंथ ट्रेनिंग, फंक्शनल ट्रेनिंग, कार्डिओ आणि पुरेशी विश्रांती या तंदुरुस्तीच्या विविध घटकांचा समावेश केला आहे.

यंदाच्या विश्वचषकात बांगलादेशविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात हार्दिकच्या घोट्याला दुखापत झाली होती. टीम इंडियाने विश्वचषकातील चौथा साखळी सामना बांगलादेशविरुद्ध खेळला. गोलंदाजी करताना हार्दिकला दुखापत झाली. दुखापत झाल्यानंतर हार्दिक मैदानाबाहेर गेला होता, त्यानंतर तो अद्याप परतला नाही.

### आयपीएलमध्ये करणार पुनरागमन?

हार्दिक पांड्या क्रिकेटच्या मैदानात कधी परतणार? हा प्रश्न अनेक चाहत्यांच्या मनात आहे. हार्दिक हा इंडियन प्रीमियर लीग २०२४मध्ये पुनरागमन करू शकतो, असे बीसीसीआयच्या एका अहवालातून समोर आले आहे. आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळणारा हार्दिक नुकताच गुजरात टायटन्सकडून मुंबई इंडियन्स संघात परतला आहे. एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत बांगलादेशविरुद्धच्या सामन्यादरम्यान हार्दिकला दुखापत झाली होती.

भारतीय संघाचा नियमित कर्णधार रोहित शर्माने २०२३मध्ये एकही टी-२० सामन्याचे नेतृत्व केले नाही. एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या पहिल्या वर्षी (२०२३) खेळल्या गेलेल्या टी-२० सामन्यांमध्ये हार्दिकने संघाची जबाबदारी सांभाळली. हार्दिकच्या दुखापतीनंतर बीसीसीआयने फॉरमॅटचा नंबर वन बॅट्समन सूर्यकुमार यादवला भारताच्या टी-२० आंतरराष्ट्रीय संघाचा कर्णधार बनवले.

विश्वचषकानंतर भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळली, ज्याद्वारे सूर्यकुमार यादवने प्रथमच भारताची जबाबदारी स्वीकारली आणि कर्णधार म्हणून चांगली कामगिरी केली. टीम इंडियाने ही मालिका ४-१ने जिंकली होती. त्यानंतर दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर खेळलेल्या टी-२० मालिकेतही त्याला कर्णधार बनवण्यात आले आहे.



# 'झुंझार'च्या क्रिकेट स्पर्धेत पनवेल संघ विजयी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथे झुंझार युवक मंडळ आयोजित कै.मिलिंद रवींद्र चवरकर स्मृतिचषक एकदिवसीय ४० षटकांच्या लेदरबॉल क्रिकेट स्पर्धेतील साखळी फेरीच्या सामन्यात लावास क्रिकेट क्लब पनवेल संघाने पोयनाड संघावर ५७ धावांनी विजय मिळवला.

नाणेफेकीचा कौल जिंकून पनवेल संघाने प्रथम फलंदाजी स्वीकारली होती. त्यांनी ४० षटकांच्या समाप्तीनंतर धावफकावर १८६ धावा लावल्या. यामध्ये आयुष पाटील याने सर्वाधिक ५९, तर अनुराग कुलकर्णी याने १६ धावांचे योगदान संघाला दिले. पोयनाड संघाकडून गौरांश सिंगने पाच, तर सौम्य केणीने तीन फलंदाजांना तंबूत धाडले. प्रत्युत्तरात पोयनाड संघाचा डाव ४० षटकांत १२९ धावांमध्ये संपुष्टात आला. दक्ष आवळे याने एकाकी झुंज देत २६ धावा केल्या. पनवेल संघाकडून आयुष पाटीलने तीन, तर अनुराग कुलकर्णीने दोन फलंदाज बाद केले. अशा प्रकारे पनवेल संघाने हा सामना ५९ धावांनी जिंकला.

अष्टपैलू खेळाडू आयुष पाटील याला सामनावीर, दक्ष आवळे स्टार प्रतिस्पर्धी खेळाडू, गौरांश सिंगला इमार्जिंग प्लेयर, तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून अद्वैत मोरे, प्रज्वल पराडकर यांना मंडळाचे सचिव किशोर तावडे, अजय टेमकर, प्रतिक मोहिते, सागर कांबळे, पराग घरत, मनोहर गोपाळे, संदीप पाटील, आदेश नाईक यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे थ्रोबॉल स्पर्धेत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत आणि रायगड



जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने झालेल्या मुंबई विभागस्तरीय शालेय थ्रोबॉल स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# भारत-इंग्लंड महिला संघांत आजपासून टी-२० मालिका

## सर्व सामने विनामूल्य पाहता येणार

**मुंबई : प्रतिनिधी**

इंग्लंडचा महिला संघ भारत दौऱ्यावर आला आहे. बुधवार(दि.६)पासून मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर उभय संघांत तीन टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. ६, ९ आणि १० डिसेंबर रोजी वानखेडे स्टेडियमवर हे तिन्ही सामने खेळवले जाणार आहेत. विशेष म्हणजे हे सर्व सामने क्रिकेट चाहत्यांना विनामूल्य पाहता येणार आहेत. प्रेक्षकांकडून कसल्याही पैशांची आकरणी केली जाणार नाही.

याबाबतची घोषणा एमसीएने आपल्या एक्स अकाउंटवरून केली आहे. सामन्यांच्या तारखा लक्षात ठेवा आणि या अद्भूत संधीचा फायदा घ्या, असे आवाहनही एमसीएने केले आहे. एरवी अशा आंतरराष्ट्रीय सामन्यांसाठी हजारो रुपयांचे तिकीट आकारले जाते, पण भारत विरुद्ध इंग्लंडचे तिन्ही टी-२० सामने विनामूल्य पाहता येणार आहेत.

# जिल्हास्तरीय तायक्वाँदो स्पर्धेत कोपरखैरणे शाळेचा डंका

## सर्वाधिक ४० पदके जिंकली



**नवी मुंबई : बातमीदार**

सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षातील नवी मुंबई महापालिका शालेय जिल्हास्तरीय तायक्वाँदो स्पर्धा नुकतीच सीबीडी बेलापूर येथील वारकरी भवनात झाली. या स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षाआतील वयोगटामध्ये ४५० विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग घेत प्रतिसाद दिला. यामध्ये नमुमंपा महानगरपालिका शाळा क्र.३६, कोपरखैरणे येथील मुला-मुलींनी सर्वाधिक ४० पदके पटकाविली.

स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या उपायुक्त ललिता बाबर यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांनी नवी मुंबई शहरात अत्यंत चांगल्या सुविधा व प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध होत आहेत. त्याचा जास्तीत जास्त लाभ खेळाडूंनी घ्यावा, असे आवाहन करतानाच आधुनिक सुविधा उपलब्ध होत असल्याने नवी मुंबईतील खेळाडू भाग्यवान आहेत, असे मत व्यक्त केले. स्पर्धेवेळी क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव उपस्थित होते.

या स्पर्धेत कोपरखैरणे शाळेच्या मुला-मुलींनी ११ सुवर्ण, १६ रौप्य व १३ कांस्यपदके जिंकली. यामध्ये देवयानी हिरवे, निकिता राठोड, स्वरा कांबळे, श्रेया शेलार, शेजल कंक, काजल ढाकरगे, नंदिनी चव्हाण, आयुष लिघाटे, आर्यन दिंडे, वैभव गुंजाळकर, आर्यन निकम यांनी सुवर्णपदक; जानवी भारती, आदिती खबुले, तनिषा वांगडे, श्रावणी उबाळे, श्रद्धा खाटपे, दुर्वा वांगडे, सीमा राठोड, श्रावणी शेलार, करिश्मा चव्हाण, खुशी विश्वकर्मा, जयश्री जाधव, दिलशान भालेराव यांनी रौप्यपदक; तर चैत्रा इजेरी, ममता मोहिते, साक्षी राऊत, सारिका अंभोरे, सानिका हिरवे, मनिषा राऊत, समृद्धी पाटील, चैताली मांढरे, पुनम पवार, आकाश यमकर, अरविंद पत्तार, अक्षय ढवळे, आदित्य हिरवे, अथर्व कांगणे, मानव मुलगे, बुध्दम सरवदे यांनी कांस्यपदक मिळविले. या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सुभाष पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

विजयी खेळाडूंचे महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी अभिनंदन करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# रोलर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये 'सीकेटी'च्या विनित जाधवला कांस्यपदके



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील घणसोली येथे रोलर ॲथलेटिक्स जिल्हा चॅम्पियन शिप स्पर्धा झाली. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थी विनित विशाल जाधव याने दोन कांस्यपदके पटकाविले.

विनितने लाँग डिस्टन्स ५०० मीटर व शॉर्ट डिस्टन्स १०० मीटरमध्ये दोन कांस्य मिळविली. त्याची निवड खोपोली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाली आहे.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी.गडदे, सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी विनितचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# चौकच्या श्री स्वामी नारायण गुरुकुलमध्ये ऑलिम्पिक स्पर्धा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

क्रीडामय वातावरण निर्माण करून विविध खेळांना उत्तेजन देण्याच्या दृष्टीने तसेच आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरावर आपले नैपुण्य दाखवत असलेल्या खेळाडूंना स्पर्धेत खेळण्याची जास्तीत जास्त संधी प्राप्त व्हावी या दृष्टीने चौक येथील श्री स्वामी नारायण गुरुकुल आंतरराष्ट्रीय शाळेत ऑलिम्पिक २०२३ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धा ७, ८ व ९ डिसेंबर रोजी गुरूकुलच्या भव्य अशा मैदानावर होणार आहे. या स्पर्धेत क्रिकेट, फुटबॉल, बास्केटबॉल, थ्रोबॉल, डॉजबॉल, हॉलिबॉल, कॅरम, रस्सीखेच, बुद्धीबळ, बॅडमिंटन, १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर धावणे, टेबल टेनिस अशा विविध खेळांचा समावेश आहे. विशेष म्हणजे ही स्पर्धा निःशुल्क आहे.

या स्पर्धेत शांतिनिकेतन पब्लिक स्कूल न्यू पनवेल, रिलायन्स फाउंडेशन स्कूल लोधिवली, जी.जे.एम इंग्लिश मीडियम खालापूर, रिलायन्स फाउंडेशन इंग्लिश माध्यम स्कूल लोधिवली, सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल लोधिवली, हिमांशू दिलीप पाटील स्कूल नढाळ, नॅशनल पब्लिक स्कूल खोपोली, श्री स्वामी नारायण गुरुकुल आंतरराष्ट्रीय स्कूल नवी मुंबई आणि सेंट विन्सेंट पीलोटी स्कूल रिसवाडी या शाळांनी भाग घेतला आहे.

# स्पोर्ट्स बिझनेस लीडर ऑफ द इयर पुरस्काराने जय शाह सन्मानित

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**




भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव जय शाह यांनी आपल्या नावावर एक मोठी कामगिरी केली आहे. शाह यांना २०२३ क्रीडा व्यवसाय क्षेत्रातील विभागात स्पोर्ट्स बिझनेस लीडर ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. बीसीसीआयने शाह यांचे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पुरस्कार जिंकल्याबद्दल अभिनंदन केले, की त्यांनी क्रिकेट जगतावर अमिट छाप सोडली आहे.

बीसीसीआयने नमूद केले, बीसीसीआयचे मानद सचिव जय शाह यांना सीआयआय स्पोर्ट्स बिझनेस अवॉर्ड्स २०२३मध्ये स्पोर्ट्स बिझनेस लीडर ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल अभिनंदन. भारतीय क्रीडा प्रशासनातील कोणत्याही नेत्यासाठी हा पहिलाच सन्मान असून तो योग्य व्यक्तीला दिला आहे! त्यांचे हे नेतृत्व बीसीसीआयला जगात पुढे नेत आहे.

बीसीसीआयने पुढे म्हटले की, ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचा समावेश करणे यासारख्या मोठ्या उपक्रमांनी क्रिकेट खेळ कायमचा बदलला आहे. जय शाह यांनी क्रिकेट जगतात एक महत्त्वाचा ठसा उमटवला आहे. त्यांचा क्रिकेट प्रशासनातील प्रवास गुजरात क्रिकेट असोसिएशनपासून सुरू झाला. गुजरात क्रिकेट असोसिएशनमध्ये त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर शाह यांनी वयाच्या ३१व्या वर्षी बीसीसीआयच्या मानद सचिवाची भूमिका स्वीकारली.

### विश्वचषक स्पर्धा केली यशस्वी

जय शाह यांनी यंदाच्या एकदिवसीय विश्वचषकाचे आयोजन करण्यात कोणतीही कसर सोडली नाही. त्यांनी चाहत्यांना आणि खेळाडूंना खूप चांगल्या सुविधा दिल्या. विश्वचषकामध्ये भारत अनेक मोठे विक्रम रचण्यात यशस्वी ठरला. यामुळेच ही स्पर्धा आयसीसीची सर्वात यशस्वी स्पर्धा ठरली. कोविड-१९च्या महामारीतही त्यांनी बीसीसीआयचे नुकसान होऊ दिले नाही आणि बायो बबलमध्ये स्पर्धा आयोजित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

# बुमराहला वेग वाढवण्यासाठी नीरजकडून सल्ला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सध्याचा ऑलिम्पिक चॅम्पियन नीरज चोप्राने त्याचा आवडता वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला अधिक वेग कसा वाढवता येईल याचा सल्ला दिला आहे. एकदिवसीय विश्वचषक फायनल पाहण्यासाठी तो नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर उपस्थित होता. नीरजने बुमराहला त्याचा आवडता वेगवान गोलंदाज म्हणून वर्णन केले असून त्याच्या गोलंदाजीच्या शैलीचे कौतुक केले आहे.

जसप्रीत बुमराहने विश्वचषकात चमकदार कामगिरी करीत २० विकेट घेतल्या होत्या. तथापि, नीरज चोप्राला वाटते एक छोटासा बदल त्याचा आवडता वेगवान गोलंदाज




जसप्रीत बुमराहचा वेग वाढवण्यास मदत करेल. तो आयडिया एक्सचेंज या कार्यक्रमात म्हणाला की, जसप्रीत बुमराहची गोलंदाजी करण्याची शैली आवडते. मला वाटते त्याचा वेग आणखी वाढवण्यासाठी त्याने रन अप वाढवले पाहिजे. भालाफेकपटू या नात्याने आम्ही अनेकदा चर्चा करतो की, गोलंदाजाने थोडेसे मागून रन अप सुरू केल्यास त्याचा वेग वाढेल.

बुमराहने ऑगस्टमध्ये आयर्लंड मालिकेदरम्यान पुनरागमन केले आणि तो त्याच्या जुन्या रंगात परतला. दुखापतीनंतरही त्याने आपल्या ॲक्शनमध्ये बदल केला नाही. त्याचा वेगही कमी झाला नाही. पुनरागमनानंतर तो अधिक धारदार दिसत आहे. विश्वचषकातील कामगिरी हे त्याचे उदाहरण आहे. बुमराहची दक्षिण आफ्रिका दौऱ्यावरील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी निवड करण्यात आली आहे. एकदिवसीय आणि टी-२० मालिकेत तो संघाचा भाग असणार नाही.

# भारताविरुद्धची कसोटी मालिका मोठे आव्हान -मॅककलम

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

आक्रमक शैलीत खेळताना इंग्लंडच्या कसोटी संघाने दर्जेदार कामगिरी केल्याचे समाधान असले तरी आता पुढील वर्षी भारतात होणाऱ्या कसोटी मालिकेत आम्हाला सर्वांत मोठे आव्हानाला सामोरे जावे लागेल, असे मत इंग्लंडच्या कसोटी संघाचा मुख्य प्रशिक्षक ब्रेंडन मॅककलमने व्यक्त केले. या मालिकेला २५ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे.

मॅककलमच्या मार्गदर्शनाखाली इंग्लंडच्या संघाने पाकिस्तानात कसोटी मालिका जिंकली, तर न्यूझीलंडमध्ये झालेली मालिका १-१ अशी बरोबरीत सोडवली, मात्र भारतीय संघाला मायदेशात नमवणे हे सर्वांत अवघड आव्हान मानले जाते.

# विजय हजारे चषक स्पर्धेत संजू सॅमसनचे दमदार शतक

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

विजय हजारे चषक स्पर्धेत संजू सॅमसनने दमदार शतकाची नोंद केली. दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी वन डे संघात निवड झालेल्या संजूने केरळ संघाचे नेतृत्व सांभाळताना रेल्वेविरुद्ध शतक झळकावले, पण केरळला १८ धावांनी हार मानावी लागली. प्रथम फलंदाजी करताना रेल्वेने ५ बाद २५५ धावा चोपल्या, मात्र प्रत्युत्तरात केरळला ८ बाद २३७ धावाच करता आल्या.

रेल्वेची सुरुवात काही खास झाली नाही, परंतु प्रथम सिंग व साहब युवराज सिंग यांनी रेल्वेचा डाव सावरला. प्रताप सिंगने ७७ चेंडूंत दोन चौकार व तीन षटकारांसह ६१ धावांची खेळी केली. साहब सिंग १३६ चेंडूंत १३ चौकार व एक षटकाराच्या मदतीने १२१ धावांवर नाबाद राहिला. कर्णधार उपेंद्र यादवने ३१ धावांची खेळी करून संगाला २५५



धावांपर्यंत पोहचवले. केरळच्या वैशाक चंद्रनने दोन विकेट्स घेतल्या.

प्रत्युत्तरात केरळचे आघाडीचे चार फलंदाज ५९ धावांत तंबूत परतले. सलामीवीर कृष्णा प्रसादने २९ धावा केल्या. संजू सॅमसन व श्रेयस गोपाळ यांनी केरळचा डाव सावरला. संजूने १३८ चेंडूंत आठ चौकार व सहा षटकारांसह १२८ धावांची खेळी केली. गोपाळ ५३ धावांवर बाद झाला. संजू ४९.५व्या षटकात बाद झाला आणि केरळचा पराभव निश्चित झाला. रेल्वेच्या आर शर्माने चार विकेट्स घेतल्या.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com